cmyk

## संपादकीय

### शासनाचा निर्णय शेतकऱ्यांच्या पथ्यावर पडावा

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा वापर महाराष्ट्रात शेती क्षेत्रात करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळ बैठकीमध्ये एक धोरण ठरवण्यात आले. सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीतच कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी एक धोरण निश्चित केले असून त्याचा फायदा राज्यातील शेतकऱ्यांना होईल अशी आशाही व्यक्त केली आहे. जागतिक पातळीवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्या विविध गोष्टी सुरू आहेत त्याचा वापर भारतात किंवा महाराष्ट्रात करणे हे समजण्यासारखे असले


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### पोटाच्या उपचारानंतर काँग्रेस नेत्या सोनिया गांधींना रुग्णालयातून डिस्चार्ज

नवी दिल्ली: पोटाच्या विकारावरील उपचारानंतर काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधींना गुरुवारी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. १५ जूनपासून त्यांच्यावर दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात उपचार सुरु होते. डॉ. अजय स्वरूप यांच्या मते, ७८ वर्षीय सोनिया गांधी यांची प्रकृती आता स्थिर आहे. दरम्यान, रविवारी रात्री ९ वाजता पोटाशी संबंधित विकारासाठी त्यांना सर गंगाराम रुग्णालयाच्या सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागात दाखल करण्यात आले होते. सोमवारी त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी निवेदन जारी करुन सांगितले होते. चार दिवसांपासून डॉक्टर त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून होते. या अगोदर ९ जून रोजी, सोनिया गांधी यांची सर गंगाराम रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–५७ | शुक्रवार, दि.२० जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये निवडणुका– रवींद्र चव्हाण

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर मध्ये होण्याची शक्यता असून प्रशासनाकडून निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. तसेच निवडणुकीसाठी भाजपची तयारी सुरू आहे. भाजपचे पार्लमेंटरी बोर्ड ज्या दिशने जाण्यास सांगेल त्या दिशने जाऊ असे रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे.

### इम्तियाज जलील हा दलाल–संजय सिरसाट

संभाजीनगर–इम्तियाज जलील हा दलाल आहे, निजामाची औलाद आहे, त्याने आम्हाला शिकवायचे का की राजकारण काय असते, बाळासाहेब काय करायचे, बाळासाहेबांनी कधीही जातीचे राजकारण केले नाही, कोणत्या जातीचा कोण आहे ते पाहिले नाही. त्यांच्या विरोधात न्यायालयीन लढाई लढणार असे मंत्री संजय शिरसाट म्हणाले.

### स्वार्थी राजकारण थांबावे हीच माऊली चरणी प्रार्थना–रोहित पवार

पंढरपूर–माऊली चरणी प्रार्थना करतो की राजकारणाचा जो स्तर खाली जात आहे. पैसा दडपशाही मोहमाया दाखवून मत घेण्याचा प्रयत्न सुरू असून हे स्वार्थी राजकारण थांबावे. पूर्वी सारखे राजकारण व्हावे ही प्रार्थना असल्याचे आमदार रोहित पवार म्हणाले.

### गोदावरीच्या पाणी पातळीत वाढ, सतर्कतेचा इशारा

नाशिक–गुरुवारी सकाळपासून शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस सुरू आहे. मुसळधार पावसामुळे नाशिकमध्ये गोदावरीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. रामकुंड आणि गोदा घाट परिसरात गोदावरीची पाणी पातळी वाढली आहे. तसेच गोदावरीच्या पुरात एक कार वाहून गेली आहे.

### गुणरत्न सदावर्तेंना मनसैनिकांकडून धमकी

मुंबई : गुणरत्न सदावर्तेंना मनसैनिकांकडून फोन करुन कार फोडण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यामुळे आता सदावर्ते नेमकी काय भुमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### केदारनाथची हेलिकॉप्टर सेवा २३ जूनपासून होणार बंद

केदारनाथ: चारधाम यात्रेपैकी एक असलेल्या केदारनाथची हेलिकॉप्टर सेवा २३ जूनपासून बंद केली जाणार आहे. केदारनाथ हेलिकॉप्टर सेवा देणाऱ्या ९ कंपन्यांनी यानंतरच्या तारखांसाठी बुकिंग बंद केली आहे. साधारणता पावसाळ्यात किमान दोन कंपन्या केदारनाथ यात्रेसाठी बुकिंग घेत असतात. मात्र यंदा संपूर्ण ही सेवा बंद केली जाणार आहे.

### वाहनधारकांनो, १५ ऑगस्टपर्यंत ही नंबर प्लेट बसवा

मुंबई : जुन्या वाहनांना हायसिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्यासाठी धावपळ करणाऱ्या वाहनधारकांना राज्य सरकारने आता तिसरी मुदतवाढ दिली आहे. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना ही नंबर प्लेट बसवण्याची प्रक्रिया १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करता येणार आहे.

### सोनं आणि चांदीच्या दरात वाढ

मुंबई : सराफ बाजारात पुन्हा एकदा सोन्याच्या दरांनी उसळी घेतली असून, गेल्या २४ तासांत सोन्याच्या दरात दीड हजार रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे सोन्याचा दर प्रतीतोळा १ लाख एक हजार आठशे रुपये प्रतितोळे इतके झाला आहे. तर चांदी एक लाख १३ हजार ३०० रुपये प्रतिकिलो इतका झाला आहे.

# कंपन्यांकडून खताच्या पुरवठ्यात कपात

## लिंकिंगला विरोध केल्याने खत कंपन्यांचा कुटील डाव, शेतकरी अडचणीत

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने लिंकिंग थांबवा, असे स्पष्ट आदेश दिल्यानंतरही खत कंपन्यांनी आपली मनमानी थांबवलेली नाही. उलट, शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक मागणी असलेल्या डीएपी आणि युरियाचा पुरवठा कमी करून खरीप हंगामात अडथळा निर्माण केला जात आहे. यामुळे पेरण्या रखडण्याचा धोका निर्माण झाला असून, शेतकरी अडचणीत सापडले आहेत.**



राज्यभरातील शेतकऱ्यांनी मागील काही हंगामांपासून खत विक्रीतील अनावश्यक लिंकिंग पद्धतीविरोधात आवाज उठवला होता. यामुळे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी याविरोधात स्पष्ट आदेश देत खत विक्रीस लिंकिंग बंधनकारक करू नये, असा निर्वाणीचा इशारा खत कंपन्यांना दिला. मात्र, या आदेशानंतरही कंपन्यांनी धोरणात बदल करत डीएपी व युरिया खताचा पुरवठा कमी करण्याचा मार्ग अवलंबला आहे. परिणामी, खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेले निर्णयही खत कंपन्यांच्या मनमानीपुढे अपुरे ठरत आहेत. पेरणीसाठी खताची उपलब्धता अत्यावश्यक आहे. सरकारने अधिक कठोर पावले उचलली नाहीत, तर खत संकटामुळे शेती आणि अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. खत खरेदी करताना शेतकऱ्यांना नॅनो खत, मायक्रोन्युट्रिएंट्स, कीडनाशके किंवा इतर उत्पादनांची खरेदीही बंधनकारक केली जात होती. यालाच लिंकिंग म्हटले जाते. यामुळे डीएपी किंवा युरिया घेण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत

◀◀ पान २ वर

# १५ वर्षे बीडमध्ये ठाण मांडून तरीही एलसीबीत नियुक्ती हवी!

## एसपी दाखवणार बाहेर तालुक्याचा रस्ता; इच्छुकांच्या यादीतील ६० जणांना बीड सोडू वाटेना



**बीड । प्रतिनिधी**

**सध्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या सुरु असून एलसीबीत नियुक्ती मिळावी म्हणून ७४ जण इच्छुक आहेत. यातील चक्क ६० पोलिस कर्मचारी हे गेल्या १५ वर्षापासून बीड तालुक्यात ठाण मांडून आहेत. तरीही असे पोलिस कर्मचारी एलसीबीत नियुक्ती मिळावी यासाठी प्रयत्नशिल असल्याचे समजते. मात्र या सर्वांना पोलिस अधिक्षक नवणीत काँवत हे बाहेरच्या तालुक्याचा रस्ता दाखवणार असल्याचे**

◀◀ पान २ वर

### गुणवत्तेनुसार एलसीबीत नियुक्ती देणार–नवणीत काँवत

पोलिस अधिक्षक कार्यालयातील विविध शाखा तर कधी बीड तालुक्यातील पोलिस ठाण्यात ७४ पैकी ५० ते ६० कर्मचारी १५ वर्षे कार्यरत राहिले असल्याचे यादीवरुन दिसत आहे. तरीही त्यांना पुन्हा एलसीबीत नियुक्ती हवी आहे. अशा कर्मचाऱ्यांना बीड बाहेर नियुक्ती देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. तसेच गुणवत्तेनुसार एलसीबीत पोलिस कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिली जाणार असल्याचे पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी सांगितले.

### जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यात पुरेसा स्टाफ

जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यात यापुर्वी १ हजारपर्यंत पोलिस कर्मचारी होते. ठाण्यात कमी कर्मचारी असल्याने गतीने तपास करण्यात अडथळा येत होता. आता जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्याला ६५० नव्याने स्टाफ देण्यात आला असून सर्व ठाण्यात सध्या १४०० ते १५०० कर्मचारी आहेत. त्यामुळे यापुढे कामे चांगल्या पध्दतीने आणि गतीने होतील.

### वाहतुक शाखा गतीमान करण्याचा प्रयत्न

जिल्हा वाहतुक शाखेत पुर्वी ४० कर्मचारी होते. आता त्यातील १५ कर्मचारी कमी करुन जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाण्यात दोन पोलिस कर्मचाऱ्यांची वाहतुक पोलिस म्हणून नियुक्त केले जाणार असल्याचे पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी सांगितले. पोलिस ठाण्यातील वाहतुक कर्मचाऱ्यांवर जिल्हा वाहतुक शाखेचे नियंत्रण राहणार आहे.

### गुन्हेगारांच्या बॅनरवर पोलिसांची नजर

गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या लोकांचे बॅनरवर फोटो टाकले जातात, त्यातून समाजात वेगळा संदेश जात असल्याने आता यापुढे गुन्हेगारांच्या बॅनरवर पोलिसांची नजर राहणार असल्याचे पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी सांगितले. तसेच तसा प्रकार आढळून आल्यावर संबंधित नगर पालिका, नगरपंचायतला कळवले जाणार आहे.

## 'चिन्ह चोरले, पक्ष फोडला, वडील चोरले तरी उद्धव संपत नाही'

### उद्धव ठाकरेंचा विरोधकांवर घणाघात



**मुंबई । प्रतिनिधी**

चिन्ह चोरले, पक्ष फोडला, वडील चोरले तरी उद्धव संपत नाही. पैसा फेको तमाशा देखो असा विरोधकांकडे चोराचा बाजार भरला आहे. जे दाढी खाजवत आहेत ते आधी कुठे होते माहित नाही. आजच्या आपल्या वर्धापन दिनाच्या दिवशी जमलेल्या शिवसैनिकांचा जयघोष पाहिला तर विरोधकांचे नॅपकिनसह कपडे ओले होतील,' अशी बोचरी टीका उद्धव ठाकरे यांनी विरोधकांवर केली. ते शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना शिवसेनेचा ५६वा वर्धापन दिन मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात उत्साहात साजरा झाला. या सोहळ्यात शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि

◀◀ पान २ वर

## महाराष्ट्रात मतदानाची वेळ संपल्यानंतर ७६ लाख मतदान

### राहूल गांधी यांच्यानंतर प्रकाश आंबेडकरांचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यानंतर आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही गतवर्षीच्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची हेराफेरी झाल्याचा आरोप केला आहे. विधानसभा मतदानाची वेळ संपल्यानंतरही महाराष्ट्रात सुमारे ७६ लाख मतदान झाले. पण राहुल गांधींपासून शरद पवारांपर्यंत कोणत्याही नेत्यात या प्रकरणी कोर्टात जाऊन रेकॉर्ड मागण्याची हिंमत नाही, असे ते म्हणाले.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नुकताच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरी झाल्याचा आरोप केला होता. महाराष्ट्र निवडणुकीत मॅच फिक्सिंग झाली असून, भविष्यात बिहार विधानसभा निवडणुकीतही त्याची पुनरावृत्ती होईल, असे ते म्हणाले होते.

◀◀ पान २ वर

## आ.संदीप क्षीरसागर शहरात 'ऑनफील्ड' बीडमधील विविध कामांची केली पाहणी



**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील नागरी प्रश्न आणि कामे मार्गी लागावेत यासाठी आ.संदीप क्षीरसागर, शहरातील विविध भागांमध्ये दररोज जाऊन नागरिकांशी संवाद साधत आहेत. यासोबतच सुरू असलेल्या कामांकडे लक्ष ठेवून आहेत. गुरूवारी (दि.१९) रोजी आ.क्षीरसागर यांनी शहरात सुरू असलेल्या विविध कामांच्या ठिकाणी भेटी देऊन संबंधितांना सुचना दिल्या.**

बीड शहरात खासबाग ते मोमीनपुरा भागाला जोडणाऱ्या पूल बांधणीचे सर्वेक्षण करण्यासाठी अभियंत्यांचे पथक आले होते. यावेळी आ.क्षीरसागर यांनी अभियंत्यांसोबत जाऊन या ठिकाणी पाहणी केली. याठिकाणी मजबूत आणि भविष्यात

◀◀ पान २ वर

## शिक्षणाधिकारी (मा.) पदी प्रियाराणी पाटील यांची नियुक्ती

### खासगी संस्थांच्या नौकर भरतीमधील घोटाळेबाजांवर कारवाईचे आव्हान

**बीड । प्रतिनिधी**



जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचे तत्कालीन शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्या बदलीनंतर त्यांच्या जागी संभाजीनगरहून प्रियाराणी पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील खासगी शिक्षण संस्थांमधील झालेल्या नौकर भरती घोटाळ्यातील दोषींवर कारवाई करण्याचे आव्हान असणार आहे.

तत्कालीन शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे (मा.) यांचा कार्यकाळ वादग्रस्त राहीला असून त्यांची शासनाने बदली केल्यानंतर काही काळ हे पद रिक्त राहिले होते. जिल्ह्यात शिक्षण संस्थांच्या नौकर भरतीमध्ये झालेला घोटाळा शिंदे यांना भोवला

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.५० क्विंटल | १,७४१ | २,६३० | २,३०५ |
| ज्वारी/हायब्रिड : ५८.०० क्विंटल | २,२०३ | २,८७४ | २,५६९ |
| मका/लोकल:२१.००क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२६६ |
| तूर : ३०.०० क्विंटल | ६,०५० | ६,५६५ | ६,३१५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,४४१ | ६,४४१ | ६,४४१ |
| बाजरी: २९.०० क्विंटल | १,८५१ | २,७०० | २,३४१ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:४८.५० क्विंटल | ४,२७५ | ४,३११ | ४,२९३ |
| हरभरा:२१.०० क्विंटल | ३,४०० | ५,४०० | ५,०८७ |

# जि.प.शाळा, घरकुलासह मुलभुत गरजा पुरवण्यास प्राधान्य

## जिल्हा परिषदेचे नुतन सिईओ जितीन रहमान यांनी घेतला पदभार

**बीड । प्रतिनिधी**

**घरकुलांसंदर्भातील वेगवेगळ्या योजनांचे उद्दिष्य पुर्ण करण्यासह जलजीवन मिशन आणि नागरीकांना मुलभूत गरजा पुरवण्यासाठी प्राधान्य दिले जाणार असल्याचे झेडपीचे नुतन सिईओ जितीन रहमान यांनी दै. राज्य लोकतंत्रशी बोलतांना सांगितले. तुतन सिईओ रहमान यांनी गुरुवारी आपला पदभार स्विकारला. अतिरिक्त सिईओ वासुदेव सोळंके यांनी त्यांचे स्वागत केले.**

तत्कालीन सिईओ आदित्य जीवने यांची बदली झाल्यावर त्यांच्या जागी मुरुगानथम यांची नियुक्ती झाली होती. मात्र ते बीडला



येण्यास तयार नसल्याने जितीन रहमान यांचा आदेश शासनाने काढला. आयएएस जितीन रहमान हे २०२० च्या बॅचमधील असून सुरुवातीला लातूर,

◀◀ पान २ वर

### पहिल्याच दिवशी एचओडींची घेतली बैठक

नुतन सिईओ जितीन रहमान हे गुरुवारी रुजू झाले. पदभार घेताच जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व विभाग प्रमुखांची धावती बैठक घेतली. सर्व अधिकारी आणि विभाग प्रमुखांना कामांची गती वाढवण्याबरोबरच आपापली जबाबदारी जोखपणे बजावण्याच्या सुचना दिल्याचे समजते.

### पदभार घेताच जिल्हाधिकाऱ्यांची घेतली भेट

नुतन सिईओ जितीन रहमान यांनी सकाळी पदभार घेतल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये विकास कामांच्या संदर्भात झाल्याचे समजते.

### जॉन्सन–रहमान दोघेही केरळमधले

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि झेडपीचे सिईओ जितीन रहमान हे दोघेही केरळ या राज्यातील रहिवाशी असून दोघेही चांगले परिचित असल्याचे समजते.

cmyk

अग्रलेख

# शासनाचा निर्णय शेतकऱ्यांच्या पथ्यावर पडावा

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा वापर महाराष्ट्रात शेती क्षेत्रात करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळ बैठकीमध्ये एक धोरण ठरवण्यात आले. सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीतच कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी एक धोरण निश्चित केले असून त्याचा फायदा राज्यातील शेतकऱ्यांना होईल अशी आशाही व्यक्त केली आहे. जागतिक पातळीवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्या विविध गोष्टी सुरू आहेत त्याचा वापर भारतात किंवा महाराष्ट्रात करणे हे समजण्यासारखे असले, तरी अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्र असलेल्या शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या क्षेत्राला संजीवनी देण्याचे काम होऊ शकते का, याचा विचार करावा लागेल.

गेल्या काही वर्षांमध्ये जगातील अनेक देशांनी कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करायला सुरुवात केली आहे. सर्वसाधारणपणे शेती क्षेत्राला ज्या समस्या जाणवतात त्या समस्यांना उत्तर मिळावे यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर जगात इतरत्र केला जात आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्रातही हे तंत्रज्ञान वापरण्यात आले तर देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये प्रथम क्रमांक असलेल्या महाराष्ट्रात बळीराजाला दिलासा देण्याचे काम होऊ शकते. मुळात संपूर्ण भारताप्रमाणे महाराष्ट्रातीलही बहुतांशी शेती पावसावर अवलंबून आहे. हवामानाचा अचूक अंदाज जर मिळाला नाही आणि कधी पाऊसच पडला नाही किंवा कधी गरज नसताना मुसळधार पाऊस पडला तर शेतकऱ्याचे सर्व नियोजनच कोलमडून जाते. तंत्रज्ञान वापरताना हवामानाचा शेतीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही यासाठी या तंत्रज्ञानाचा अचूक वापर होणे गरजेचे आहे. ऋतुचक्र सातत्याने बदलत असल्याने दरवर्षी पाऊस आपली सरासरी पूर्ण करत असला तरी जेव्हा हवा तेव्हा तो पडत नाही आणि जेव्हा त्याची गरज नसते तेव्हा तो प्रचंड प्रमाणात पडतो असाच गेल्या काही वर्षांचा इतिहास आहे. याच पार्श्वभूमीवर शेतीला आवश्यक असलेल्या हवामानाच्या विषयामध्येच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याची गरज आहे. शेती फायदेशीर कशी होईल हे पाहण्यासाठी ही कृत्रिम बुद्धिमत्ता वापरता येईल का, हेही पाहावे लागेल. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतमालाला जर योग्य भाव मिळाला तर शेती फायदेशीर होऊ शकते. खतांच्या आणि बियाण्यांच्या वाढत्या किमती, पाणीपुरवठ्याची अनियमितता यामुळे शेतकऱ्याचा उत्पादनखर्च कधीच समान राहात नाही. दरवर्षी तो बदलत राहतो. त्यामुळे ठरावीक पद्धतीने त्याच्या शेतमालाला किंमत देणे शक्य होत नाही. मधल्या मध्ये दलाल मात्र पडत्या किमतीला शेतमाल खरेदी करून स्वतःचे उखळ पांढरे करतात; पण शेतकऱ्याच्या हातात काहीच राहात नाही.

सरकारच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणामध्ये विविध गोष्टींचा समावेश असला, तरी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची शेती किफायतशीर आणि फायदेशीर कशी होईल, या गोष्टीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागणार आहे. शेती फायदेशीर होत नसल्यामुळेच त्याचा कर्जबाजारीपणा वाढत जातो आणि यातून आत्महत्यांचे प्रमाणही वाढत जाते ही साखळी जर तोडायची असेल, तर कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्याला त्याच्या शेतीतून चांगला नफा मिळायला हवा. येत्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्र सरकारच्या या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाचे विविध तपशील समोर येतीलच. गेल्या काही वर्षांमध्ये हे तंत्रज्ञान समोर आल्यापासून अनेक क्षेत्रांमध्ये त्याचा फायदाच दिसून आला आहे. तसाच फायदा शेती क्षेत्रामध्येही दिसून आला, तर त्याचे स्वागतच करावे लागेल. अर्थात, काहीतरी नवीन करायच्या ईर्ष्येतून नाही तर शेतकऱ्यांना फायदा होईल या खऱ्या अपेक्षेतून अशा प्रकारचा निर्णय सरकारने घेतला असेल, तर त्या निर्णयाची अंमलबजावणीसुद्धा तेवढ्याच खरेपणाने आणि गंभीरपणे करण्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारला घ्यावी लागणार आहे. इतर क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेकडे एक आव्हान म्हणून पाहिले जात असताना, शेती क्षेत्रासाठी ते वरदान ठरू शकेल हे या निमित्ताने महाराष्ट्र सरकारला सिद्ध करावे लागेल.

# पाटोदा येथे प्रियदर्शनी प्राथमिक शाळेसह कन्या प्रशालेत पालक मेळावा उत्साहात

## डॉ.सारिकाताई क्षीरसागरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; पालकांसोबत साधला संवाद

**बीड । प्रतिनिधी**

**येथील विनायक युवक कल्याण संस्था संचलित पाटोदा येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळा आणि प्रियदर्शनी कन्या प्रशालेत गुरुवारी (दि.१९) पालक मेळावा उत्साहात पार पडला. या दोन्ही कार्यक्रमात कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच, पालकांसोबत संवाद साधला.**

पाटोदा येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत डॉ.क्षीरसागर यांच्यासह संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक डॉ.विश्वंभर देशमाने, माजी मुख्याध्यापक एस.आर.जाधव, माजी नगरसेवक संदीप जाधव, श्रीमती.अडागळे, श्रीकांत लांडगे, आशा जाधव, श्रीमती.कदम, पालक प्रतिनिधी भीमराव घोलप, भास्कर मिसाळ, ज्ञानेश्वर चापकानडे, श्रीमती.बनगे, शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक पवनकुमार मोरे, श्रीकांत लांडगे, बबन राख, पोपट उगले, संकेत माताडे, जयश्री शेलार, नवनाथ ठाकणे, अनिल राख, प्रताप नवले, रवि काळे, मुळे, अविनाश तिडके यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. हा



### दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध–डॉ.सारिकाताई क्षीरसागर

गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच मुलींच्या सुरक्षिततेलाही आम्ही प्राधान्य दतो. डॉक्टर, इंजिनिअरच्या पलीकडेही मुलींनी स्पर्धा परीक्षा, प्रशासन व इतर विविध क्षेत्रांकडे वळावे यासाठी शाळेत योग्य मार्गदर्शन दिले जाते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. पालकांनी केलेल्या सुचनांचे आम्ही काटेकोरपणे पालन करुन अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी दिली.

कार्यक्रम शाळेच्या वर्धापन दिनाच्या औचित्य साधून आयोजित केला होता. तसेच, शहरातील प्रियदर्शनी कन्या प्रशालेतील मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी बप्पासाहेब जाधव होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ.क्षीरसागर यांच्यासह नगराध्यक्षा दीपाली जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव, बीड जिल्हा पत्रकार संघाचे पाटोदा तालुकाध्यक्ष अ‍ॅड.महेश बेदरे, वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आबासाहेब हंगे, अ‍ॅड.तात्यासाहेब तवार, संदीप जाधव, जवाद शेख, मुन्ना शिंदे, सचिन गायकवाड, शाळेचे मुख्याध्यापक सचिन खोले, शिक्षक नवनाथ ढाकणे, दहिफळे आदींची उपस्थिती होती. यावेळी दहावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थिनी प्राप्ती घुमरे, देविका जाधव, बांगर, सय्यद शेख गौरव करण्यात आला.

# ट्रॅव्हल्सच्या धडकेत दुचाकीवरील दोघे ठार

## होळ जवळील घटना

**केज । प्रतिनिधी**

**अंबाजोगाईकडून केजच्या दिशेने येणाऱ्या ट्रॅव्हल्स व दुचाकीची जोरदार धडक होऊन दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. १८) रात्री होळ (ता. केज) येथे घडली.**

या अपघातात दत्तात्रय बबन फुगारे (वय ३५, रा. होळ, ता. केज) आणि संतोष भडके (वय ३२, रा. मोरवड, ता. रेणापूर, जि. लातूर) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. संतोष भडके हे फुगारे यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करत होते. दोघेही दुचाकी (क्र. एम एच –४४ एन ८४१८) वरून जेवणासाठी गेले होते आणि परत येताना ट्रॅव्हल्स (क्र. एम एच २४ एटी ९९००) ने जोरदार धडक दिली.

# प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित होतो-आ.विक्रम काळे



**प्रविण तांबडे । कळंब**

**सध्या राज्य सरकारने शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थी उपस्थित ठेवून त्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तक दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित होतो आणि त्याला शाळेची ओढ निर्माण होऊन आपुलकी तयार होते असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी केले.**

ते तालुक्यातील सौंदणा अंबा येथील संत गोरोबा काका विद्यालयातील शाळा प्रवेशोस्तव कार्यक्रमात बोलत होते. यावेळी माध्यमिक उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे,माजी कुलगुरू मधुकर गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कळंब तालुकाध्यक्ष प्रा शिवाजी लकडे, धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड,तुळजापूर तालुकाध्यक्ष श्रीकांत सुर्यवंशी, लातूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश नाडे,भाजपचे कळंब तालुकाध्यक्ष दत्तात्रय साळुंके, नंदू समुद्रे, मुख्याध्यापक परमेश्वर पालकर, मुख्याध्यापिका श्रीमती सुनीता नरवडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना काळे म्हणाले की यावर्षी शासनाने शाळा सुरू होण्याच्या अगोदरच मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश प्रत्येक शाळेत पोहच केले. त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांचा शाळेत येण्यासाठीची प्रमुख अडचण संपलेली आहे. शिक्षणाशिवाय आता आयुष्याला दिशाच मिळू शकत नाही त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पुर्ण करून आयुष्यात यशस्वी व्हावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुनिता नरवडे यांनी केले तर सुत्रसंचालन भाऊसाहेब आवाड यांनी केले आभार जाधव सुरेश यांनी केले.

### तालुक्यात या शाळांना दिल्या भेटी

शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना आंबा, रांजणी, नायगाव, घारगाव, लोकनायक माध्यमिक विद्यालय नायगाव, कृषी विद्यालय नायगाव, संत गोरोबा काका विद्यालय सौदणा अंबा, हनुमान माध्यमिक विद्यालय घारगाव, हजरत खाजा बदरोदीन विद्यालय रांजणी या शाळांना भेटी देऊन शुभेच्छा दिल्या.

# सौ.के.एस.के.(काकू) कृषी महाविद्यालयाच्या कृषी दुतांचा माती परीक्षणाचा स्तुत्य उपक्रम



**बीड । प्रतिनिधी**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. के. एस. के. (काकू ) कृषी महाविद्यालय म्हसोबा फाटा बीड येथील कृषीदूतांनी कामखेडा गावात जाऊन तेथील शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व व फायदे समजावून सांगितले, तसेच माती परीक्षण केल्याने जमिनीत व मातीत असलेले घटक समजतात व पुढील पिकासाठी लागणारे खत व मातीत असलेले खतांचे किंवा नत्र, पलाश, पोटॅश यांसारख्या खतांचे प्रमाण समजून येते व पुढील पिकाचे व्यवस्थापन करण्यास मदत होते यासारखे फायदे शेतकऱ्यांना समजावून सांगितले व तेथील शेतकरी लक्ष्मण ढोले यांच्या शेतात जाऊन माती परीक्षणासाठी माती कशी गोळा करावी याबद्दल शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले, यावेळी शेतकऱ्यांना पडलेल्या प्रश्नांचे निवारण देखील कृषिदुतांनी केले.**

कार्यक्रमत यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कृषी दुतांना महाविद्यालयाचे सहसचिव डॉक्टर जी. व्ही. साळुंखे सर, प्राचार्य डॉक्टर. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. टी. शिंदे व उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक एस. एस. राठोड यांचे मार्गदर्शन लाभले व बीज माती विज्ञान आणि कृषी रसायनशास्त्र विभागाचे प्रा. बी. आर. चादर व प्रा. ए. जी. गरडी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच यावेळी कृषीदूत कृष्णा शिंदे, फारुख शेख, व्यंकटेश कदम, युवराज खाडे,मालापुरे किशोर,ऋत्विक सोनार, मालापुरे किशोर उपस्थित होते.

## पान १ वरून...

### कंपन्यांकडून खताच्या

होता. याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर कृषिमंत्र्यांनी खत कंपन्यांना थेट आदेश दिले की, लिंकिंग थांबवावी. सुरुवातीला आदेशांवर सहमती दर्शवलेल्या कंपन्यांनी आता डीएपी व युरियाचा पुरवठा उपलब्धतेपेक्षा निम्म्यावर आणला आहे. यामुळे खत केंद्र चालक व शेतकऱ्यांना अडचणीत टाकले गेले आहे.

------------

### १५ वर्षे बीडमध्ये ठाण मांडून तरीही

म्हटले जात आहे. गेल्या १५ वर्षापासून पोलिस अधिक्षक कार्यालयासह बीड तालुक्यातील विविध पोलिस ठाण्यात ठाण मांडून असताना सुध्दा या लाडक्या पोलिस कर्मचाऱ्यांना पुन्हा एलसीबीत नियुक्ती हवी असल्याची विश्वसनीय माहिती आहे. एलसीबीत नियुक्ती हवी असणाऱ्यांची संध्या ७४ असून यातील चक्क ६० पोलिस कर्मचारी हे १५ वर्षापासून बीड तालुक्यात कार्यरत होते. यातील बहुतेक कर्मचारी हे नेत्यांचे लाडके असल्याचे बोलले जात असून त्यांच्याच आशिर्वादाने ते आतापर्यंत बीड तालुक्यात कार्यरत असल्याचे म्हटले जात आहे. आता अशा लाडक्या कर्मचाऱ्यांना पुन्हा एलसीबीत नियुक्ती हवी आहे. मात्र अशा पोलिस कर्मचाऱ्यांना पोलिस अधिक्षक नवणीत कांवत हे बाहेर तालुक्याचा रस्ता दाखवणार असल्याचे समजते.

------------

### 'चिन्ह चोरले, पक्ष फोडला, वडील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. ''भाजपने पाळलेली बेडकं आज डराव डराव करतात. या चोरांना लाज–शरम ठेवली नाही. नॅपकिन आहे, ते तरी का ठेवलं?'' असा घणाघाती टोला त्यांनी लगावला. उद्धव ठाकरे म्हणाले, ''माझ्यावरील प्रेम ही माझ्या पूर्वजांची पुण्याई आणि तुम्हा सर्वांचा विश्वास आहे. बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते, 'काय व्हायचं ते होईल, पण मी शिवाजी पार्कात सभा घेईन.' मी तेव्हा माँसोबत समोर बसलो होतो. आज जे दाढी खाजवतात, ते तेव्हा कुठे होते माहीत नाही.'' त्यांनी भाजपवर निशाणा साधताना म्हटले, ''ज्यांना राजकारणात पोरं होत नाहीत, ते आमच्यावर टीका करतात. भाजपने कधी स्वतःचे नेते घडवले नाहीत. दुसऱ्यांच्या नेत्यांना मोठं करायचं आणि मग त्यांच्याच नावाने हिंदुत्व शिकवायचं. ज्या सरदार पटेलांनी संघावर बंदी घातली, त्यांचाच पुतळा उभारणारा हा भाजपचा ढोंगीपणा आहे.'' भाजपच्या विश्वासघातावर बोलताना ठाकरे म्हणाले, ''निवडणुकीत माता–भगिनींशी आणि जनतेशी केलेले वादे भाजप पाळत नाही. मग माझ्याशी केलेला अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाचा वादा कसा पाळतील? केंद्रात सरकार आल्यापासून पणवती लागली आहे. मंदिराचं छत गळतं, विमान अपघात होतात, रेल्वे अपघात होतात, मेट्रोत पाणी भरतं. पण कोणी जबाबदारी घेत नाही.'' त्यांनी केंद्र सरकारच्या नेतृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ''देशाला पंतप्रधानाची गरज आहे, भाजपच्या पंतप्रधानाची नाही. देशाला गृहमंत्र्याची गरज आहे, घरफोड्या अमित शाहची नाही. देशाला संरक्षणमंत्र्याची गरज आहे, गुंडांना संरक्षण देणाऱ्या देवेंद्र आणि राजनाथ सिंगाची नाही,'' असे ते म्हणाले. पुढे बोलताना ठाकरेंनी काश्मीरमधील सुरक्षा स्थितीवरून सरकारला धारेवर धरले. ''इंडिया आघाडी उभी केली, तर आमची तुलना इंडियन मुजाहिद्दीनशी केली. मग आम्ही जर मुजाहिद्दीनसारखे होतो, तर तुमच्या न केलेल्या शौर्याचं कौतुक जगभरात करायला आमच्या खासदारांना का पाठवलं?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ''आज देशाला खरे नेते हवेत, फक्त पक्षाचे घरफोडे करणारे नाहीत,'' असे सांगत त्यांनी शिवसैनिकांना आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. या सोहळ्यात ठाकरे यांनी शिवसेनेच्या संघर्षमय इतिहासाचा उल्लेख करत कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण केला. ''शिवसेना कधीच झुकली नाही आणि यापुढेही झुकणार नाही. आम्ही सत्य कधी नाकारले नाही. आता जनतेसोबत राहून या पाळीव बेडकांना उत्तर देऊ,'' असे ते म्हणाले.

### जे राज्याच्या मनात आहे तेच मी करेन ; राज ठाकरे यांच्या सोबत करण्याची तयारी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या वर्धापन दिन सोहळ्यात मनसे सोबतच्या युतीसंदर्भात सकारात्मक असल्याचे संकेत दिले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत युतीचा पर्याय अजून खुला असल्याचे संकेत उद्धव ठाकरे यांनी दिले. शिवसेनाप्रमुखांच्या ब्रँडचा उल्लेख करुन आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने उद्धव ठाकरेंनी एक पाऊल पुढे टाकले आहे. जे तुमच्या मनात आहे, जे महाराष्ट्राच्या मनात आहे तेच करायला तयार आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. ही लढाई केवळ उद्धव ठाकरेंची नाही, शिवसेनेची नाही. १९६० साली ज्या मराठी माणसाने बलिदान देऊन, रक्त सांडून मुंबई मिळवून दिली, त्या मुंबईचे महत्त्व खत्म होऊ देणार नाही म्हणून उभे राहिलो तर मुंबई वाचेल, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

------------

### शिक्षणाधिकारी (मा.) पदी

असून त्यात त्यांची बदली झाली. आता त्यांच्या जागी संभाजीनगरहून विभागीय मंडळातील सहसचिव प्रियाराणी पाटील यांची झेडपीच्या शिक्षणाधिकारी (मा.) पदी नियुक्ती केली आहे. त्यामुळे पदभार घेतल्यावर नौकर भरतीमधील घोटाळेबाजांवर कारवाई करण्याचे त्यांच्यासमोर आव्हान असणार आहे.

**पाटील रुजू होतील का?**

गेल्या काही दिवसापासून बीड जिल्ह्यात वरिष्ठ अधिकारी येण्यास तयार नसल्याचे चित्र आहे. झेडपीचे सिईओ म्हणून मुरुंगानथम एम. यांची बदली झाली होती. मात्र त्यांनी येण्यास नकार दिला. त्यामुळे प्रियाराणी पाटील सुध्दा पदभार घेतात की बीडला येण्यास नकार देतात? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------

### आ.संदीप क्षीरसागर शहरात 'ऑनफील्ड'

दिर्घकाळ टिकणार्या पुलाचे बांधकाम होणार असल्याचे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. तसेच शहरातील बार्शी नाका ते विधी महाविद्यालयापर्यंत ३३ के.व्ही. विद्युत मार्गिकेचे काम सुरू होत आहे. याठिकाणचीही आ.क्षीरसागर यांनी पाहणी करून संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना केल्या. यासोबतच कारंजा ते जुनाबाजार परिसरात नगरपालिकेकडून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याठिकाणी आ.संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केली. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, संबंधित यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

------------

### महाराष्ट्रात मतदानाची वेळ

त्यांच्या या आरोपामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ माजली होती. त्यानंतर निवडणूक आयोगासह भाजपनेही त्यांचे आरोप धुडकावून लावले होते. आता प्रकाश आंबेडकर यांनीही या निवडणुकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल गतवर्षी २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला होता. त्यात महायुतीला सर्वाधिक २३० जागा मिळाल्या. त्यात भाजपला सर्वाधिक १३२, शिवसेना (शिंदे गट) ५७ व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ४६ जागा मिळाल्या आहेत.

------------------

### जि.प.शाळा, घरकुलासह मुलभुत गरजा

वर्धा आणि नाशिक येथे सिईओ म्हणून काम केले आहे. सिईओ रहमान हे गुरुवारी रुजू झाले असून अतिरिक्त सिईओ वासुदेव सोळंके यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी दै. राज्य लोकतंत्रशी बोलताना रहमान म्हणाले, जिल्ह्याला घरकुलसंदर्भात जे टार्गेट दिले आहे, ते वेळेत पुर्ण करण्यासाठी आमचे प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच पालकमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे आदर्श जि. प. शाळा करण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. तसेच जलजीवन मिशनसंदर्भातही आता लक्ष घातले जाणार असून मुलभूत गरजा या वेळेत कशा पुरवल्या जातील, याकडे आमचे लक्ष राहणार असल्याचे ते म्हणाले.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २० जून २०२५


# भिमनगरातील किराणा दुकानात चोरी, शहर पोलिसात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील भिमनगर भागात प्रकाश हरिभाउ सावंत यांच्या मालकीच्या असलेल्या किराणा दुकानांत अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली असुन या चोरीत हजारो रूपयांचे साहित्य चोरट्यांनी पळविले आहे.

याबाबत प्रकाश सावंत यांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १६ जुन रोजी किराणा दुकान बंद करून गेलो व दि. १५ जुन सकाळी दुकानाकडे गेलो असता दुकानाचा पत्रा उचकटलेला दिसला. आत जाउन पाहिले असता दुकानातील रोख रक्कम व इतर साहित्य चोरीला गेल्याचे दिसले. दि. १५ जुनच्या रात्री २ ते ५ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी गल्यातील नगदी १५५० रूपये, थम्सअपच्या काही बाटल्या, बिस्कीट पुडे अंदाजे ११५० रूपये असा एकुण २७०० रूपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ हे करत आहेत.

# जिल्ह्यातील गुन्हेगारीवर वचक बसविण्यात पोलिस यंत्रणेला यश - पो.अ.नवनीत कॉंवत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**गेल्या वर्षीच्या तुलनेत या पाच महिन्यात बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर वचक बसविण्यात पोलिस यंत्रणेला यश प्राप्त झाले आहे. आगामी काळात पोलिस यंत्रणेत निश्चितच सुधारणा दिसेल. यासाठी नागरिकांनीही स्वत:ची कर्तव्य पार पाडुन पोलिस यंत्रणेला मदत करावी. असे आवाहन बीड जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी केले.**

बुधवारी सायंकाळी नगर परिषदेच्या आद्यकवी मुकुंदराज सभागृहात नवनीत कॉंवत यांच्या उपस्थित उपविभागीय जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या जनसंवाद बैठकीस अपर पोलिस अधिक्षक चेतना तिडके, शहर पोलिस ठाण्याचे शहर पोलिस निरिक्षक शरद जोगदंड, ग्रामिण पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक मुरलीधर खोकले यांच्यासह परिसरातील पोलिस ठाण्याचे अधिकारी उपस्थितीत होते.यावेळी नवनीत कॉंवत यांनी २०२४ या वर्षाचा गुन्हेगारी आलेख मांडत २०२५ मध्ये गेल्या पाच महिन्यात गुन्हेगारी रोखण्यात पोलिस यंत्रणा यशस्वी ठरल्याचे सांगितले. पोलिस यंत्रणेत अनेक बदल करण्यात आले असून हे बदल हळुहळु जनतेसमोर निर्दशनास येतील असे सांगुन जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत ठेवण्यासाठी नागरिकांचीही जबाबदारी तेवढीच असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात सायबर गुन्हे त्या-त्या पोलिस ठाण्यात दाखल होतील. तशी ऑर्डर आपण काढणार असल्याचे त्यांनी सांगितले.



अंबाजोगाईत पोलिस अधिक्षकांच्या उपस्थितीत झाली जनसंवाद बैठक

जिल्ह्यात व अंबाजोगाई परिसरात फ्रॉड प्लॉटींग धारकांवर कठोर कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अंबाजोगाईचे वाहतुक यंत्रणा व वाहतुकीची कोंडी सुरळीत करण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ देणार असल्याचे सांगितले.

अनेक जणांनी अधिक्षकांसमोर वाचला तक्रारीचा पाढा

वाहतुक समस्या, पोलिसांचा नैतिक दबदबा नाही, पोलिस यंत्रणा धनदांडग्या सोबत व सावकारांच्या बाजूने असते, खोटे गुन्हे दाखल होतात, पोलिसांची विश्वासर्हता राहिली नाही, पोलिस ठाण्यात गेल्यानंतर गुन्हा दाखल करून घेतला जात नाही, अवैध धंदे, गावठी दारू सर्रासपणे विक्री होते. पोलिस यंत्रणेत अवैध व्यवसायीकांचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात राहतो अशा अनेक तक्रारींचा पाढा यावेळी नागरिकांनी पोलिस अधिक्षकांसमोर वाचला.

११०० लोकसंख्येचं गाव अन्? गावात दारू विक्रीची ११ दुकानं

परळी तालुक्यातील सेलु हे ११०० लोकवस्तीचं गाव आहे. या गावात दारू विक्रीची ११ दुकाने आहेत. अशी कैफियत गावातील महिलांनी पोलिस अधिक्षकांसमोर मांडली. गावातील लहान मुले सुद्धा दारूच्या व गुटख्याच्या आहारी जात आहेत. त्यामुळे शेतीची विक्री करून दारूच्या व्यसनात पैसे बर्दाद होत आहेत. यापुर्वी ही गावची दारू बंदी करावी या बाबत २०१७, २०२३ मध्ये परळी पोलिस ठाण्यात तक्रारी केल्या मात्र पोलिस कसलीही दखल घेत नाहीत. अशी कैफियत पोलिस अधिक्षकांसमोर गावातील महिलांनी मांडली.

अपर पोलिस अधिक्षक तिडकेंविरूद्ध अनेकांनी व्यक्त केली नाराजी

अंबाजोगाई येथील अपर पोलिस अधिक्षक चेतना तिडके या अपर पोलिस अधिक्षक असूनही या परिसरात त्यांचा वचक नाही या परिसरातील वाढती गुन्हेगारी, सावकारकी, खोटे दाखल होणारे गुन्हे या बाबत त्यांच्याकडे तक्रारी करूनही त्या या संदर्भात कसलीही दखल घेत नाहीत. अशा अनेक तक्रारी उपस्थितीत प्रतिनिधिंनी त्यांच्यासमोरच पोलिस अधिक्षकांकडे मांडल्या.

## पान ६ वरून...

### मन्मथ स्वामी समाधीस्थ

कपिलधार परिसरातील दोन धबधबे, डोंगररांग आणि हिरवळ ही या परिसराची खरी शान होती. मात्र पर्यावरण विभागाची कोणतीही परवानगी न घेता झाडांची तोड आणि डोंगराचे उत्खनन सुरू असून, त्यामुळे डोंगर कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. समाधीच्या आसपासची पवित्र पिंड फोडली गेली असून, परिसरात शेवाळ वाढलेले, दृष्य अत्यंत दैन्यवाणं झाले आहे असे आरोप केले जात आहे. कपिलधार संस्थेवर दोन विश्वस्त असून, गेल्या २५ वर्षांपासून वाद सुरू आहे. त्यामुळे कोणतेही विकासकाम शिस्तबद्ध न होता, स्वार्थीपणाने आणि गुपचूप राबवले जात आहे. ट्रस्टमधील निधीचा वापर पुरातत्त्व विभागाला कल्पना न देता उत्खननासाठी केला गेला असे आरोप ही ग्रामस्थानाकडून केले गेले आहे. भाविकांच्या श्रद्धास्थानात चाललेली ही खोदामोदी धार्मिक भावना दुखावणारी आहे असंच म्हणण्याची वेळ आली आहे.

भाविकांसाठी कोणत्याही मूलभूत सुविधा नाहीत..!

देशभरातून येणार्या शेकडो भाविकांची होणारी गैरसोय ही लाजिरवाणी बाब आहे.पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृहांची,निवासाची कोणतीही योग्य सुविधा येथे उपलब्ध नाही. ज्या स्वच्छतागृहांची बांधणी केली ती तीन किलोमीटर लांब, वापरण्याजोगी नाहीत. काही ठिकाणी बांधलेली स्वच्छतागृहे कुलूपबंद आहेत असा आरोप नागरिकाकडून लावण्यात आला आहे.

स्थानिक ग्रामस्थांवर अन्याय, सेवाकार्याला मान्यता नाही..!

कपिलधार यात्रेच्या काळात परिसरातील ५ ते १० गावांतील लोक स्वखुशीतून सेवा देतात - अन्नदान, स्वच्छता, मदतकार्य. मात्र, त्यांना विश्वस्तांकडून कोणतीही मान्यता नाही. उलट 'हा आमचा देव आहे, तुमचा काही संबंध नाही' अशा द्वेषपूर्ण भावना व्यक्त करून स्थानिकांची अवहेलना केली जाते असे ही आरोप ग्रामस्थांकडून केले जात आहे.

सुरक्षेचा अभाव - महिलांमध्ये भीती..!

स्थळी कोणतीही सुरक्षा यंत्रणा नाही. महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे.पोलीस चौकी असली तरी ती निष्क्रिय आहे.कार्यक्रमांच्या वेळी गोंधळ माजतो, पण ट्रस्टकडून कोणतीही दक्षता घेतली जात नाही असे ही बोलले जात आहे.

भाविक आणि ग्रामस्थांची मागणी स्पष्ट..!

निसर्गाच्या विनाशास तात्काळ आळा घालावा,सर्व विकासकामांसाठी शासकीय परवानग्या अनिवार्य कराव्यात,ट्रस्टमध्ये स्थानिकांचा व भाविकांचा सहभाग असावा,स्वच्छता, पाणी, सुरक्षा आणि निवास सुविधा तातडीने द्याव्यात,दोषींवर चौकशी करून कारवाई करावी भाविक आणि ग्रामस्थानाकडून केली जात आहे.

कपिलधारच्या धबधब्याखाली युवक बुडून मृत्यूमुखी

शिंदे (वय अंदाजे २३) या युवकाचा कपिलधारच्या धबधब्याखाली बुडून मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना बुधवारी घडली.मिळालेल्या माहितीनुसार, ओंकार आपल्या काही मित्रांसोबत कपिलधार येथे सहलीसाठी गेला होता. सर्वजण धबधब्याजवळ पोहण्यासाठी उतरले असता ओंकार पाण्यात अडकला. मदतीस कोणी पोहोचण्याआधीच तो गडप झाला. त्यानंतर पोलिस प्रशासन आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने शोध घेतल्यानंतर त्याचा मृतदेह सापडला.या घटनेची नोंद पोलिसांनी आकस्मित मृत्यू म्हणून केली असून अधिक तपास सुरु आहे. ओंकारचा मृतदेह बीड येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आला, त्यानंतर रात्री त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.ओंकार अत्यंत गरिब घरातील होता. खाजगी नोकरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होता. त्याच्या अकस्मात निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### धानोरा खु. येथे महिलांची

केले. काकडे यांनी सोयाबीन बियाणे उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया, टोकन यंत्राच्या साह्याने रुंद सरी वरंब्यावर सोयाबीन टोकन करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. सिडिओ शिवप्रसाद येळकर यांनी शेतीशाळेचे महत्त्व, रससोशक किडींच्या व्यवस्थापनासाठी कमी खर्चातील चिकटसापळे तयार करणे, कामगंध सापळे, सापळा पिकांची लागवड, चुनखडी युक्त शेत जमिनीमधील ऊस पिकामधील पिवळसरपणा विकृती व्यवस्थापन, ऊस पिकामधील पोक्का बाईंग रोग व्यवस्थापन संदर्भात विस्तृतपणे मार्गदर्शन केले तसेच नॅचरल शुगरच्या माध्यमातून ड्रोनच्या साह्याने अनुदानित फवारणी, नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर उपलब्धता बाबत माहिती दिली. ग्राम महसूल अधिकारी सुहास चाटे यांनी ॲग्रीस्टॅक बाबत मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी मुंडे, सरपंच पार्वती पोळ, बेस्ट ॲग्रोचे प्रतिनिधी शिनगारे, कृषी पर्यवेक्षक स्वप्निल खोसे, तुकाराम रेड्डी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अंबाजोगाई शहरातील वीज

जेणेकरून ग्राहकांची आर्थिक लूट होणार नाही. त्याचबरोबर वीज बिलामध्ये प्रत्येक महिन्याच्या बिलात विविध प्रकारच्या छुप्या आकारण्या लावून बिलाची रक्कम वाढविली जात आहे. याचा देखील भार ग्राहकांच्या माथी दर महिन्याला मारला जात असून यामुळेही ग्राहकांची प्रचंड आर्थिक लूट होत आहे.तेव्हा अशा प्रकारे होत असलेली वीज ग्राहकांची आर्थिक लूट तात्काळ थांबवण्याची मागणी राजकिशोर मोदी यांनी कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनातुन केली आहे.

सदर केलेल्या निवेदनाची दखल घेऊन नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचे काम त्वरित बंद करावे , ज्या ग्राहकांच्या ज्यादा बील आल्याच्या तक्रारी असतील त्या तक्रारींच्या चौकशी करून त्वरित त्यांचा निपटारा करावा, तसेच वीज बिलातील स्थिर आकार, वीज आकार, वहन आकार, इंधन समायोजन आकार, वीज शुल्क अशा प्रकारच्या सर्व छुप्या शुल्काची आकारणी बंद करून ग्राहकांनी वापरलेल्या विजेचे बिल ग्राहकांना वितरित करावे अशी मागणी मोदी यांनी करताना दिलेल्या निवेदनाची दखल न घेतल्यास जनहितार्थ आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही राजकिशोर मोदी व त्यांच्या उपस्थित सर्व सहकार्यांनी कार्यकारी अभियंता महावितरण अंबाजोगाई याना दिला आहे . या निवेदनावर राजकिशोर मोदी यांच्यासह मनोज लखेरा, महादेव आदमाणे, पत्रकार दत्तात्रय अंबेकर, सुनील वाघाळकर, दिनेश भराडीया,धम्मा सरवदे, अंकुश हेडे, खलील जाफरी, सय्यद रशीद, आकाश कऱ्हाड, दत्ता सरवदे, रफीक गवळी,मतीन जरगर, कैलास कांबळे, संतोष चिमणे, शरद काळे,यांच्यासह अनेक सहकारी बांधवांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

### पाऊस लांबला

पेरणी करण्यासाठी आवश्यक ओलावा जमिनीमध्ये नसल्याने पेरणीचा फायदा होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरण्यांना कापुस लागवड वगळता मुग,तुर,बाजरी व सोयाबीनच्या पेरण्यांना सुरवात केली नाही. सोयाबीन,सूर्यफ फूल,तूर,मूग, बाजरी,तीळ व कापुस या पिकांची जुन महिन्यात पेरणी होते. मात्र, गेल्या दोन वर्षांत तूर, सोयाबीनच्या उत्पादनात वाढ झाली आहे. मात्र, जुन महिना निम्म्यावर आला तरी पाऊसच न झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

# श्री गणेश विद्या मंदिर शाळेत नवीन विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर (भां) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर व कै. प्रशांत तुकाराम पोकळे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य मुरलीधर पवार होते.कार्यक्रमाच्या सुरूवातीला शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची ढोल-ताशांच्या गजरात,लेझीमच्या तालावर भवानीदेवी मंदिरापासून शाळेपर्यंत दुतर्फा उभे राहून शाळेच्या विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात मिरवणूक काढली.शाळेत पोहोचताच नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन सहर्ष स्वागत करण्यात आले.यानंतर प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.यानंतर शाळेचे पर्यवेक्षक जाधवर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये शाळेतील विविध उपक्रमांविषयी नवीन विद्यार्थ्यांना माहिती दिली.शाळेचे मुख्याध्यापक आर बी बडे यांनी चालू शैक्षणिक वर्षापासून शाळेत राबविल्या जाणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता () तसेच विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीवर भर देणार असल्याचे सांगितले.अंमळनेर गावच्या शाळा सुधार मोहिमेचे पाथरूडकर यांनी विद्यार्थ्यांना शाळा प्रवेशासाठी व उज्जल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



यानंतर विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते वही,पेन तसेच शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले तसेच इ.१०वी व १२वी बोर्ड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारदेखील करण्यात आला.शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमासाठी माजी सरपंच अर्जुन पवार,पांडुरंग पवार तसेच शिक्षणप्रेमी ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल काकडे सरांनी केले तर रामहारी खलाटे सरांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या सर्व शिक्षक-शिक्षकेतर सेवकांनी सहभाग घेतला.

# शेतीखर्च व शिक्षणखर्चासाठी शेतकऱ्याच्या कुटुंबाला आ. राठोड यांचा मदतीचा हात

जालना । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील उमरखेड येथील अल्पभूधारक शेतकरी गौतम आसाराम जाधव (४२) यांचे अंगावर विज पडून आकस्मित निधन झाले होते. मयत शेतक-याच्या कुटुंबाची तातडीने भेट घेऊन आमदार राजेश राठोड यांनी मदतीचा हात दिला. मयत शेतकयाच्या तीनही मुलांचा पदवी पर्यंतच्या शिक्षणाचा खर्च करणार असल्याचे सांगून त्यांनी कुटुंबाला आधार दिला. एकीकडे घरातील कमावता व्यक्ती गेल्याचे दुःख तर दुसरीकडे अत्यंत बिकट आर्थिक पौरस्थीती असल्याने या कुटुंबावर

मोठा आघात झाला आहे. सध्या पेरणीचे दिवस असल्याने शेतीसाठी मोठा खर्च लागणार आहे. अशा बिकट परिस्थितीत



शेतीसाठी लागणारे बियाणे औषधी आणि खत देखील आमदार राठोड यांनी उपलब्ध करून दिले आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून

आ. राठोड यांनी घेतलेल्या भूमिकेचे स्वागत होत आहे. यावेळी प्रकाश घुले, सरपंच गौतम सदावर्ते, अशोक चव्हाण, रघुवीर जाधव, अचीत जाधव, बाबासाहेब जाधव, बापूरा बापूराव जाधव, विनायक राठोड, नितीन राठोड, भारत राठोड, ब्रम्हानंद जाधव आदी उपस्थित होते.

# शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी विश्व पदयात्राचे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वागत

**जालना । प्रतिनिधी**

जनतेमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांतविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी विश्वशांती विश्वपदयात्रा घेणारी पर्वतोरोहींची चमू जालना जिल्ह्यात दाखल झाली आहे. या विश्व पदयात्रेचे नेतृत्व करणाऱ्या गिनीज बुक व लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर अवध बिहारी लाल यांच्या चमूने जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेतली.

ही यात्रा डेंजर्स ॲडव्हेंचर्स अंतरवेद स्पोर्ट्सतर्फे राबविण्यात येत आहे. या चमूत जितेंद्र प्रताप, महेंद्र प्रताप, गोविंदा नंद हे पर्वतारोही सहभागी आहेत. या यात्रेने आतापर्यंत ११ देशांमध्ये एकूण ४.४८ लाख किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण केला असून २०१८ मध्ये जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंतची यात्रा यशस्वीरीत्या पूर्ण केली. यात्रेच्या माध्यमातून १४ कोटी



५० लाख वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

देशभरातील ६०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये ही पदयात्रा झाली असून उत्तराखंड, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश, गुजरात तसेच दमन-दीव व दादरा नगर हवेलीमध्येही जनजागृती कार्यक्रम राबवले गेले आहेत. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी २९ जिल्ह्यांमध्ये यात्रा झाली असून त्यांनी जालना जिल्ह्यात आरटीओ, वनविभाग यांच्या समवेत विविध उपक्रम राबवले.या यात्रेचा उद्देश केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा प्रचार करणे आहे, ज्यात पर्यावरण व वन्यजीव संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, पर्वत व नदी संरक्षण, बेटी बचाओ बेटी पढाओ, रस्ते सुरक्षे संदर्भातील जनजागृती, जनसंवर्धन, स्वच्छ भारत मिशन अशा अनेक योजनांचा समावेश आहे. या यात्रे अंतर्गत शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती व सार्वजनिक ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष भेटी, व्याख्याने व जनजागृती कार्यक्रम राबविले जात असल्याची माहिती जितेंद्र प्रताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांना दिली.

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH NO.02483271787
जा. क्र. २०२५/नपघ/ जा. प्र./कावी १२०८. दिनांक:१९/०६/२०२५

**जाहिर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार प्रल्हाद जनार्दन वाघुंडे रा. वलखेड ता. अंबड जि. जालना यांनी नामे १) शेख मोबीन शेख निरोद्दिन २) शेख सलमान मुन्ना रा. ता अंबड जि. जालना यांच्याकडून रजिस्टर दस्त क्र ७५९ दि. ०१/०३/ २०१८ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडून आवक क्र.(१८५४) दिनांक. १८/०६/२०२५ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.१. शेख मोबीन शेख नुरोद्दीन २. शेख सलमान शेख मुन्ना रा. अंबड जि. जालना नावावर असलेला गट नं.(१९६) सिटी सर्वे नं.मधील प्लॉट नं.८,९,१०,२१,२२,२३ प्रत्येकी प्लॉटचे क्षेत्र ७५.०० चौ.मी असे एकूण ४५०.०० चौ. मी.जागा ज्याची

संयुक्त चतु: सीमा खालील प्रमाणे आहे
पूर्व : ६ मीटर रोड
पश्चिम:मादळा रोड
दक्षिण:प्लॉट नं.११ व २०
उत्तर:प्लॉट नं ७ व २४

या वरील चतु: सीमा मधील प्लॉटचे क्षेत्र ४५०.०० चौ. मी. जागा खरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजून नोंद कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी करिता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसावंगी**

# कृषी अधिकारी प्रशांत पवार यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

**उप विभागीय कृषी अधिकारी यांचा चौकशी अहवाल शेतकऱ्या विषयी असलेल्या संदिग्ध स्वरूपाचा असून उप विभागीय कृषी अधिकारी प्रशांत पवार यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून चौकशीसाठी विभागीय समिती स्थापन करावे याबाबत**

**सुदाम शामराव गाडेकर, गुंफाबाई शामराव गाडेकर घिगलखेडा येथील रहिवासी, आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, श्री. पवार उपविभागीय कृषी अधिकारी जालना यांनी त्यांच्या कर्तव्यात निष्काळजीपणा शेतकऱ्यांची व शासनाची फसवणूक केली आहे.**

मी त्यांच्याकडे अनेक वेळा फळबाग लागवडीचे अनुदान मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी त्यांच्याकडे गेल्या होत्या. त्यानुसार त्यांनी चौकशी करून कृषी सहायक सुनील रोकडे व राजू ढवळे यांनी प्रशासकीय दुर्लक्ष केले असून दोषी आढळल्याचा अहवाल दिला होता. परंतु २२/५/२०२५ ला उपविभागीय कृषी अधिकारी प्रशांत पवार यांनी चौकशी अहवाल क्रमांक १०९५,१०९६,१०९७,१०९८व ३०/७/२०२४ असा अहवाल विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय मध्ये दिलेला आहे. त्यात कृषी सहाय्यक सुनील रोकडे व यांनी कामाकडे दुर्लक्ष केले असून त्यांच्यावर सेवा शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी असा अहवाल दिलेला आहे. परंतु शेतकऱ्या विषयी त्यांनी धक्कादाय अहवाल त्यांनी दिलेला आहे. अहवालामध्ये मध्ये त्यांनी शेतकऱ्यांनी फळबागा जिवंत ठेवण्याची जबाबदारी पार पाडली नाही. तसेच आज रोजी शेतकऱ्यांच्या शेतात फळबागा जिवंत नाही. त्यामुळे शेतकरी अनुदानास पात्र ठरत नाहीत, असा अहवाल देऊन त्यांनी शेतकऱ्यांची मोठी फसवणूक केली आहे. तसेच वरिष्ठ कार्यालय जिल्हा कृषी अधिकारी व विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजी नगर यांची सुद्धा फसवणूक केलेली आहे.

मंडळ तालुका कृषी अधिकारी यांचा अहवाल दिनांक २५/५/२०२४ पंचनामा त्यात त्यांनी २०१९ ते २०२३ पर्यंत फळबागा जिवंत होत्या. परंतु २०२४-२०२५ भीषण पाणीटंचाईमुळे फळबागा वाळून गेल्या. कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांना फळबाग लागवडीच्या अनुदान मिळाले नाही. असा त्यांनी अहवाल सादर केलेला आहे.

तालुका कृषी अधिकारी भोकरदन यांनी २७/५/२०२४ ला भोकरदन तालुक्यातील दुष्काळामुळे काढून टाकलेल्या फळबागाचा अहवाल उपविभागीय कृषी अधिकाऱ्यामार्फत जिल्हा कृषी अधिकारी यांना पाठवलेला आहे. त्या अहवालामध्ये आम्हा सर्व शेतकऱ्यांकडे ६ वर्ष फळबागा जिवंत होत्या. परंतु दुष्काळामुळे भीषण पाणीटंचाई असल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवन फिरावे लागत असत फळबागासाठी पाणी उपलब्ध होऊ न शकल्याने आमच्या फळबागा वाळून गेले त्यामुळे आम्ही काढून टाकले. तसेच भोकरदन तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांनी दुष्काळामुळे फळबागा काढून टाकले आहे रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड करण्याकरिता कृषी विभाग व शेतकऱ्यांमध्ये फळबाग लागवडीचे अनुदान मिळवण्याकरिता ३ वर्षापर्यंत फळबागा जिवंत असणे बंधनकारक आहे. परंतु आमच्या फळबागा ६ वर्ष जिवंत होत्या. त्यामुळे फळबाग लागवडीचे अनुदान रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी नाही निकषानुसार आम्हाला मिळालाच पाहिजे. कृषी सहायक सुनील रोकडे यांच्या निष्काळजीपणामुळे ते आम्हाला मिळाले नाही.

उपविभागीय कृषी अधिकारी प्रशांत पवार शेतकऱ्यांच्या विषयी खोटा रिपोर्ट देऊन शेतकऱ्यांच्या हक्क हौरवण्याचा प्रकार या ठिकाणी त्यांनी केलेला आहे. विभागीय कृषी सहसंचालक आपण विभागीय कृषी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. त्या अनुषंगाने त्यांनी कृषी सहायक सुनील रोकडे यांना अभय देण्यासाठी व शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचीत केलेला आहे. एक जबाबदार अधिकारी आशा खालच्या पातळीवर जाऊन शेतकऱ्यांच्या हक्कावर गदा आणण्याचा प्रकार या ठिकाणी त्यांनी केला आहे. व शेतकऱ्यांची फसवणूक करून शासनाची दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त अपील नियम १९७९ अंतर्गत कारवाई करण्यात यावी.

# दिंद्रुडच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे डॉ. सोनाजीराव रांजवण नामकरण

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये नामकरण डॉ.सोनाजीराव रांजवण नुकतेच करण्यात आले.या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पाणी फिल्टर योजनेचा शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला. सिंदफना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजी रांजवन यांची प्रमुख उपस्थिती होती.

शाळेचे मुख्याध्यापक प्राचार्य गणेश उजगरे,पर्यवेक्षक पी.जी लखमावाड आदी मान्यवर उपस्थित होते. सन २०२४-२५ इयत्ता दहावी व बारावी, नीट परीक्षा मध्ये चांगले गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. भागवत युवराज दिगंबर, सय्यद महेक अकिल, ठोंबरे ज्ञानेश्वर सुदाम, मते वेदिका रघुनाथ, शिरसे प्रतिभा चंद्रकांत , साळुंखे साक्षी



कैलास,गव्हाणे प्रतीक अरुण, मुंडे सीता मधुकर ,मायकर अजिंक्य गणेश ,मुंडे निकिता सुधाकर, ठोंबरे योगिनी युवराज ,कोथिंबीर ऐश्वर्या वैजनाथ, कोथिंबीर अनिकेत ज्ञानेश्वर या विद्यार्थ्यांचा पालकासह शाल,श्रीफळ , पुष्पहार, गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील पालक दत्ता शिंदे, नवनाथ ठोंबरे ,शिवहार कटारे, गणेश ठोकरे ,सुदाम ठोंबरे ,मस्के मुंडे,कोथिंबीरे सह एस .एस बारावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष शिवाजी रांजवन यांनी कै. डॉ. सोनाजीराव रांजवण साहेबांच्या शैक्षणिक कामाचा आढावा सांगितला व विद्यार्थ्यांमधील कौशल्य ओळखून पालकांनी खर्च न करता चांगले शिक्षण द्यावे अशी आवाहन केले, कार्यक्रमाचे अध्यक्ष जी.व्ही उजगरे यांनी अहवाल वाचन व अध्यक्षीय समारंभातून विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले , आभार संस्कृतीक विभाग प्रमुख के.बी भोसले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक ,शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले व कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

# शेतीतील मजुरीविषयक धोरणाबाबत शासन ठोस पावले उचलणार

## माणिकराव कोकाटे यांची माहिती

पुणे : शेतीतील उत्पादकता वाढावी तसेच शेतीचा उत्पादन खर्च कमी व्हावा यासाठी शेतीतील मजुरीविषयक धोरण ठरविण्याबाबत शासन ठोस पावले उचलणार आहे. कमी मनुष्यबळात काम करणे, मानवविरहित यंत्राचा वापर करणे, कृषी यांत्रिकीकरणासाठी शासन विविध कृषी यांत्रिकीकरणाच्या योजना राबवत आहे शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी आलेल्या सर्व सूचनांचा सकारात्मक विचार करून त्यावरती कार्यवाही करेल, असे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघ व महाराष्ट्राला आश्वासित केले.



मंत्रालयात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाविषयक शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे बोलत होते. यावेळी कृषी विभागाचे प्रधानसचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी आयुक्तालय पुणेचे दूरदृश्यप्रणालीद्वारे कृषी आयुक्त सुरज मांढरे, संचालक रफिक नायकवडी, सुनिल बोरकर, विनयकुमार आवटे, डॉ. के. पी. मोते, शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश पाटील, सदस्य बीडचे नाथराव कराड, परभणीचे सदाशिव थोरात, कोल्हापूरचे सर्जेराव पाटील, साताराचे विश्वंभर बाबर, वाशिमचे रविंद्र गायकवाड, कर्जतचे पांडूरंग डोंगरे, साताराचे राजेंद्र गायकवाड, ठाणेच बबन हरणे, नागपूरचे आत्मास्वामी खोपडे, जळगाव प्रविण पाटील-फरंकाडे यासह इतर पुरस्कारप्राप्त शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की, कृषी विषयक समित्यावर शासन निर्णय घेऊन कृषी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना सदस्य म्हणून घेण्यात येईल. शेतीविषयक कामांसाठी योग्य ते धोरण ठरविण्यात येईल शासनाकडे याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करू, पीक विमा योजनेत सुधारणा करणे, कृषी विद्यापीठे व कृषी विज्ञान केंद्र यांना सक्षम करत आहोत. नवीन पिकाचे संशोधन करण्यासाठी शासन नेहमीच प्रोत्साहन देत असते. जमिनीची सुपीकता वाढवून पिकाची उत्पादकता वाढविणे यासाठी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले की, राज्य शासन व केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबत काही सूचना असतील तर त्यावरती जरूर विचार करू. शासन शेतकऱ्यांच्या हितार्थ नक्कीच चांगल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करेल. नवीन तंत्रज्ञानाच्या वापर करून पिकाची उत्पादकता वाढवणे, कृषी विषयक प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांना ग्रामपंचायतीची कर आकारणी रद्द करणे याबाबत नक्कीच कार्यवाही करू. कृषी पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमास शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाच्या प्रतिनिधीस आमंत्रित करून व्यासपीठावर एका सदस्याला उपस्थित राहण्याची संधी देण्याबाबत शासन कार्यवाही करेल, असेही यावेळी सांगितले.

# जमनापारी शेळी देते सर्वाधीक फायदा



जमनापारी जातीच्या शेळीचे दूध लवकर खराब होत नाही. या जातीच्या शेळ्या दररोज सुमारे ४ ते ५ लिटर दूध देतात. त्याच वेळी या जातीचा स्तनपान कालावधी सुमारे १७५ ते २०० दिवस आहे आणि ही शेळी एका स्तनपानात ५०० लिटर पर्यंत दूध देते. याशिवाय शेळ्यांची जात सुधारण्यासाठी परदेशातील शेळीपालक भारतातून जमनापारी जातीची आयात करतात.

देशी-विदेशी बाजारपेठेत शेळ्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पहिले तर मांस आणि दुधासाठी शेळ्या पाळल्या जात आहेत. त्याची मागणी बाजारात नेहमीच असते. अशा परिस्थितीत चांगल्या जातीच्या शेळ्या-मेंढ्या पाळल्या तर दर महिन्याला चांगले उत्पन्न मिळू शकते. यामुळे पशुपालकांसाठी आज आम्ही एका चांगल्या जातीच्या शेळीची माहिती घेऊन आलो आहे. ज्याची दररोज चार ते पाच लिटर दूध देण्याची क्षमता आहे.

जमनापारी जातीच्या शेळीची किंमत : जमनापारी जातीच्या शेळीचे दूध लवकर खराब होत नाही. या जातीच्या शेळ्या दररोज सुमारे ४ ते ५ लिटर दूध देतात. त्याच वेळी या जातीचा स्तनपान कालावधी सुमारे १७५ ते २०० दिवस आहे आणि ही शेळी एका स्तनपानात ५०० लिटर पर्यंत दूध देते. याशिवाय शेळ्यांची जात सुधारण्यासाठी परदेशातील शेळीपालक भारतातून जमनापारी जातीची आयात करतात. या जातीच्या ५० टक्के शेळ्या सुमारे दोन मुलांना जन्म देण्यास सक्षम असतात. दूध, मांस, मुलांना जन्म देणारी आणि तिच्या शरीराचा आकार यामुळे जामनापारी जात बाजारात प्रसिद्ध आहे. या जमनापारी जातीच्या शेळ्यांची किंमत सुमारे १५ ते २० हजार रुपये आहे.

जमनापारी जातीच्या शेळीची वैशिष्ट्ये : जमनापारी जातीच्या शेळ्यांचा रंग पांढरा असतो. या जातीच्या शेळीला त्याच्या स्वादिष्ट मांसामुळे देशी-विदेशी बाजारपेठेत मागणी आहे. भारतात जमनापारी जातीच्या शेळ्या बहुतेक उत्तर प्रदेशातील इटावा भागात आढळतात. त्याचबरोबर या जातीच्या काही शेळ्या बिहार, राजस्थान आणि पश्चिम बंगालमध्येही दिसतात. आता महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणात या शेळीचे पालन होऊ लागले आहे.

# सेंद्रिय घटक वाढवण्याचा सर्वात सोपा मार्ग

अलीकडच्या काळात अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळताना दिसत आहेत. सेंद्रिय शेती मधून येणाऱ्या पिकाला बाजारात भावसुद्धा चांगला मिळत असल्याने यावर भविष्यात मागणी वाढण्याची शक्यता आहे. सेंद्रिय शेतीसाठी जमिनीतील सेंद्रिय घटक फार महत्वाची भूमिका पार पाडतात. जमिनीतील हे सेंद्रिय घटक कसे वाढवायचे याबाबत माहिती जाणून घेतल्यास चांगला फायदा होईल.



उष्ण हवा आणि कमी पाऊस यांमुळे अधिकतर क्षेत्रातील सेंद्रिय घटकांचे भस्मीकरण जलद गतीने होते. सेंद्रिय भागाचे विघटन व भस्मीकरण होणे ही बाब महत्त्वाची आहे. पण उष्ण हवेत ही प्रक्रिया फार जलद होते. त्यामुळे सेंद्रिय घटक तयार होण्याच्या क्रियेत समतोलपणा राहत नाही. हा समतोलपणा येण्यासाठी खालील उपायांचा अवलंब करावा.

१) जमिनीस अधिक प्रमाणात सेंद्रिय खते किंवा भरखते पुरविली पाहिजेत. भरखते ही एकाच वेळी भरपूर प्रमाणात न देता ती प्रत्येक पिकास टप्प्याटप्याने परंतु नियमितपणे द्यावीत. २) जमिनीतील सेंद्रिय घटक नैसर्गिक हवामान बदलावर अवलंबून असल्याने त्याचे प्रमाण वाढविणे अशक्यप्राय आहे. परंतु त्याचा समतोल राखला जाईल यासाठी कंपोस्ट खत, शेणखत, पालापाचोळा, पिकांचे अवशेष वगैरेंचा वापर करावा. ३) धैंचा, ताग, शेवरी, बरबडा तसेच पार्थेनियम यासारख्या हिरवळीच्या खतांची लागवड करून ती पिके फुलोऱ्यात येताच जमिनीत गाडावीत. हिरवळीची पिके पेरताना व नांगरून टाकताना फॉस्फेटयुक्त खते द्यावीत किंवा हिरवळीचे पीक गाडल्यानंतर घेण्यात येणाऱ्या पिकांच्या स्फुरदाची खत मात्रा हिरवळीच्या खतात द्यावी. ४) कडधान्यवर्गीय गवते उदा. टाकळा, तरवड, बरबडा फुलोऱ्यात येण्यास सुरुवात होत असताना अथवा पार्थेनियमसारखी पिके फुलोऱ्यापूर्वी शेतात गाडल्यास त्यापासूनही जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविता येते. ५) सुबाभूळ अथवा गिरीपुष्प यांसारखी झाडेसुद्धा बांधावर लावून त्यांची एक मीटरवर वारंवार छाटणी करून त्यांच्या कोवळ्या फांद्या शेतात नुसत्या पसरल्या तरीही त्यांचा तिहेरी फायदा होतो. पहिला फायदा जमिनीवर आच्छादन करता येते. त्यामुळे पावसाच्या थेंबाने होणारी मातीची धूप थांबविता येते. तसेच जमिनीत जास्त पाणी मुरविता येते व बाष्पीभवनामधून उडून जाणाऱ्या पाण्याचे संवर्धन करता येते. तसेच या फाद्यांचे कर्ब- नत्राचे गुणोत्तर कमी असल्यामुळे त्याचे दीड ते दोन महिन्यांत भस्मीकरण होऊन पुढील पिकास अन्नद्रव्यांचा चांगला पुरवठा होतो व रासायनिक खताची मात्रा कमी करता येते. भस्मीकरणाची क्रिया सावकाश करण्यासाठी जमिनीवर पालापाचोळ्याचा थोडा जास्त थर राहू द्यावा, यालाच इंग्रजीत ऑरगॅनिक मल्च (सेंद्रिय आच्छादन) असे म्हणतात. ६) जमिनीची कमीत कमी मशागत केल्यास सेंद्रिय पदार्थाचा -हास होत नाही.

एकंदरीत जमिनीतील सेंद्रिय घटक हे पीक उत्पादनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत व त्याची घट वरचेवर भरून काढणे अत्यावश्यक आहे. ज्या शेतीमध्ये जमिनीतील सेंद्रिय घटकांचे प्रमाण कमी होत जाते ती शेती किफायतशीर होऊ शकत नाही. शेतकऱ्यांनी याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३७ : व्हिक्टोरिया इंग्लंडच्या राणीपदी
१८४० : सॅम्युअल मोर्स यांना टेलिग्राफ चा पेटंट मिळाला.
१८६३ : वेस्ट व्हर्जिनिया अमेरिकेचे ३५ वे राज्य बनले.
१८७७ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी कॅनडा मध्ये जगातील पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरवात केली.
१८८७ : देशातील सर्वाधिक गर्दीचे स्टेशन व्हिक्टोरिया टर्मिनस (सध्याचे नाव सी. एस. टी.) सुरू झाले.
१८९९ : केंब्रिज विद्यापीठाच्या 'ट्रायपॉस' या गणिताच्या अंतिम परीक्षेत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे पहिल्या वर्गात पहिले आल्यामुळे त्यांना सिनिअर रँग्लर होण्याचा बहुमान मिळाला.
१९२१ : टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना
१९६० : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना
१९९० : ७.४ मेगावॅटचा भूकंपात इराण मध्ये ५०,००० लोक ठार तर १,५०,००० पर्यंत जखमी झाले.
१९९७ : 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तर्फे राज्यातील पहिली मुलींची सैनिकी शाळा पुण्याजवळ सुरू झाली.
२००१ : परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झाले.
२०१४ : प्रसिद्ध कवी केदारनाथ सिंह यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : प्रसिद्ध ब्रिटीश व्यापारी व राजकारणी सर एडवर्ड अल्बर्ट ससून यांचा जन्मदिन.
१८६९ : लक्ष्मणराव किर्लोस्कर किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९५६)
१८७६ : भारतीय तेलगु भाषिक चित्रपट क्षेत्राच्या इतिहासातील प्रसिद्ध पहिले गीतकार चांदला केसावदासू यांचा जन्मदिन.
१९१५ : टेरेन्स यंग चिनी-इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९४)
१९२० : मनमोहन अधिकारी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान, कम्युनिस्ट नेते (मृत्यू: २६ एप्रिल १९९९)
१९३९ : रमाकांत देसाई जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (मृत्यू: २८ एप्रिल १९९८)
१९४८ : नौरूचे राष्ट्राध्यक्ष लुडविग स्कॉटी यांचा जन्म.
१९५२ : भारतीय लेखक आणि कवी विक्रम सेठ यांचा जन्म.
१९५४ : ॲलन लॅम्ब इंग्लिश क्रिकेटपटू
१९७२ : पारस म्हांब्रे क्रिकेटपटू
१९७६ : प्रसिद्ध भारतीय महिला कसोटी व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू देविका पळशीकर यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६८ : हेन्रिच रॉथ जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (जन्म: १८ डिसेंबर १६२०)
१८३७ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (जन्म: २१ ऑगस्ट १७६५)
१९१७ : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जेम्समेसन क्राफ्ट्स यांचे निधन.
१९३० : ब्रिटीश कालीन रामपूर रियासतचे नवाब हमीद अली खान बहादूर यांचे निधन.
१९७२ : साली प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ प्रा. कोट्टरलाकोटा रंगधामा राव यांचे निधन.
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक पद्मभूषण डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)
१९९७ : बासू भट्टाचार्य चित्रफट दिग्दर्शनाच्या पदार्पणातच राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारे निर्माते व दिग्दर्शक (जन्म: १९३४)
१९९७ : वासुदेव वामन तथा 'भाऊसाहेब' पाटणकर ऊर्फ 'जिंदादिल' मराठीतले पहिले शायर (जन्म: ? ? १९०८)
२००७ : सुप्रसिद्ध भारतीय बंगाली चित्रपट अभिनेत्री अनिता गुहा यांचे निधन.
२००८ : चंद्रकांत गोखले अभिनेते (जन्म: ७ जानेवारी १९२१)
२००९ : पाकिस्तान देशाचे कीटकशास्त्रज्ञ, प्राध्यापक, अभिनेते आणि उद्योजक दतुक रहमान अन्वर सय्यद यांचे निधन.
२०१० : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू गुंडीबाईल रामा सुंदराम यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार डिकी रुतनागुर यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १९३१)
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)

# असे करा केळीवरील रोगांचे नियंत्रण

महाराष्ट्रात केळी लागवड प्रामुख्याने जून-जुलै महिन्यांत केली जाते. जून - जुलै महिन्यात लागवड केलेल्या केळी बागेला मृग बाग असे म्हणतात. मृग बाग लागवडीतील केळी घड उन्हाळी हंगामात काढणीस तयार होतात. विविध कारणांमुळे मृग बागेचं नुकसान जास्त प्रमाणात दिसून येते. केळी बागेत प्रामुख्याने करपा म्हणजेच सिगाटोका या बुरशीजन्य आणि कुकुंबर मोझॅक या विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यापैकी कुकुंबर मोझॅक म्हणजेच सीएमव्ही या विषाणूजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे केळी बागेचं मोठ्या प्रमाणात नुकसान होते. हा रोग लागवडीच्या सुरुवातीला येतो. नुकसान जास्त होत असल्यामुळे रोग नियंत्रणासाठी रोप पूर्ण उपटून नष्ट करावे लागते. यामध्ये मृग बाग लागवडीची वेळ काटेकोरपणे पाळणे अत्यंत आवश्यक आहे. मृग बाग केळी लागवड ही मे महिन्याचा शेवटच्या आठवड्यात किंवा जून महिन्यात करावी. जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात केळीची लागवड करणे टाळावे. जून महिन्यात लागवड केलेल्या केळी बागांवर सीएमव्ही रोगाचं प्रमाण काही भागांत अगदी कमी राहते असे दिसून आले आहे. तर काही बागा पूर्णपणे रोगमुक्त होत्या. पण जुलै-ऑगस्ट महिन्यांत लागवड केलेल्या बागांवर रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसून येत होता. काही ठिकाणी तर बागेतील सर्व झाडे उपटून नष्ट करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. त्यासाठी केळीची लागवड ही गादीवाफ्यावर करावी. गादीवाफ्यावर लागवड केल्यामुळे मुळांची वाढ चांगली होऊन झाडांची वाढही चांगली होते. त्यामुळे साहजिकच घडांची वाढ चांगली होऊन ते वजनाने देखील जास्त भरतात. वेळोवेळी बागेत हलकी टिचणी करून झाडांना भर देत राहावे. त्यामुळे वादळी वाऱ्यामुळे झाडे पडण्याचे प्रमाण कमी होते.

लागवडीचे अंतर : रोग व्यवस्थापनामध्ये लागवडीचे अंतर ही अत्यंत महत्त्वाची बाब असते. केळी फळपिकात 'श्रीमंती' व 'फुले प्राइड' यांसारख्या बुटक्या वाणांची लागवड दीड बाय दीड मीटर अंतरावर करावी. तर 'ग्रॅडनैन' या उंच वाढणाऱ्या वाणाची १.७५ मीटर बाय १.७५ मीटर अंतरावर लागवड करावी. योग्य अंतरावर लागवड केल्यामुळे बागेत हवा खेळती राहून बाग निरोगी राहण्यास मदत होते. दाट लागवडीमुळे सिगाटोका आणि सीएमव्ही रोगाच्या प्रादुर्भावास अनुकूल वातावरण निर्मिती होते.

कंद निरोगी बागेतूनच निवडा : कंदापासून लागवड करताना कंद निरोगी बागेतूनच निवडावेत. लागवडीपूर्वी शिफारशीप्रमाणे कंद प्रक्रिया करावी. शेतकऱ्यांचा कल हा ऊतीसंवर्धित रोपांकडे जास्त असतो. मुळातच उतिसंवर्धित रोपे नाजूक असल्याने ती रोगास सहज बळी पडतात. उतिसंवर्धित रोपांची लागवड करताना रोपे उत्तम दुय्यम कणखरता असलेली आणि ४ ते ५ पान असलेली निवडावीत. छोटी, कमी पाने असलेली पुरेशी कणखरता नसलेल्या रोपांची लागवडीसाठी निवड करू नये.

सजीव कुंपण लागवड : बरेच शेतकरी केळी लागवडीवेळी सजीव कुंपण लागवडीकडे दुर्लक्ष करतात. बागेभोवती दुहेरी ओळीत शेवरी पिकाची सजीव कुंपण म्हणून लागवड करण्याची शिफारस केली आहे. अशाप्रकारे केळीची लागवड करताना काळजी घेतल्यास केळी बागेपासून चांगले उत्पादन मिळू शकेल.



# आश्रमशाळा चालकांच्या उदासीनतेमुळे आश्रम शाळेतील मुलांकडे दुर्लक्ष

## शाळा प्रवेशासाठी हार, सत्कार तर दुरच निदान आस्थेने विचारपूस तरी करायला हवी

बीड। प्रतिनिधी

शाळा प्रवेशाच्या निमित्ताने संपुर्ण राज्यभर जिल्हा परिषदेच्या व खासगी संस्थेच्या शाळा मध्ये दि.१६ जुन रोजी नविन मुलांच्या प्रवेशासाठी जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मोठ्या उत्साहात चिमुकल्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गणवेश,पुस्तक, वह्या,पेन आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.मात्र याचवेळी राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या ९७७ आश्रमशाळां मधील विद्यार्थ्यांचा जिल्हा प्रशासन तसेच शिक्षण विभागाला विसर पडल्याचे दिसून आले. या विभागामार्फत विमुक्त भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्गाच्या आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला मुलींसाठीच्या निवासी शाळा, विद्यानिकेतन, निवासी कनिष्ठ महाविद्यालय आहेत.याठीकाणी विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी



यासाठी अधिकारी वर्ग सुद्धा उपलब्ध आहे.मात्र शाळा प्रवेशाच्या आनंद महोत्सवात बोटावर मोजण्याईतक्या शाळा वगळता बहुतांश शाळांमध्ये हा उत्सव साजरा करण्यात आलाच नाही. त्यामुळे आश्रम शाळा केवळ अनुदान लाटण्यासाठीच आहेत का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

बीड जिल्ह्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत भटक्या व इतर मागास बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना निवासी व अनिवासी मोफत शिक्षण मिळावे या हेतूने बीड जिल्ह्यातील ३० संस्थे अंतर्गत ४५ प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळा कार्यरत आहेत. बीड जिल्ह्यात ४५ आश्रम शाळा मधून १० हजारापेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची नोंद आहे. बीड जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या २३ असुन त्यात निवासी विद्यार्थी संख्या २५०० तसेच माध्यमिक शाळांची संख्या १४असुन त्यातून १००० पेक्षा जास्त आणि उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थी संख्या ०८ असुन निवासी विद्यार्थी संख्या ५०० पेक्षा जास्त आहे. तर जिल्ह्यातील आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थ्यांची संख्या ५००० पेक्षा जास्त आहे.

आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थ्यांकरीता शासनाकडून प्रति विद्यार्थी २२०० रूपये प्रतिमाह परिपोषण अनुदान देत आहे.वसतिगृहात निवास व्यवस्था यामध्ये अंथरूण, पांघरूण,गादी, सतरंजी, ब्लँकेट तसेच भोजनाची व्यवस्था म्हणून ताट,वाटी,पेला, शैक्षणिक साहित्य यामध्ये वही,पेन,पाटी, पेन्सिल, विद्यार्थ्यांना २ शालेय गणवेश,नाईट ड्रेस तसेच केस कर्तन,तेल, साबण, दंतमंजन, कोलगेट यासह वैद्यकीय सुविधा म्हणून प्रथमोपचार तसेच करमणुक व खेळाचे साहित्य,पर्यायी विद्युत व्यवस्था, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही, सौर ऊर्जा उपकरणे आदी सुविधांसाठी लाखो रुपयांचा खर्च केल्याचे दाखवते.मात्र ब-याच आश्रम शाळेतील सीसीटीव्ही केवळ दिखावा असुन बंदच असतात. आश्रम शाळेतील निकृष्ट आहाराच्या तक्रारी आढळतात.भौतिक सुविधांची वानवा आढळून येते. शासन विद्यार्थ्यांवर खर्च करत असताना इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिकारी आश्रमशाळा चालकांशी संगनमताने तक्रारींकडे व मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करत असल्याने आश्रमशाळा केवळ अनुदान लाटण्यासाठीच आहेत का?? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

शैक्षणिक विषमतेची दरी नष्ट करत सामाजिक ध्रुवीकरण नष्ट करण्यासाठी सयाजीराव गायकवाड,, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, सावित्रीबाई फुले आदिंनी पुढाकार घेत भटक्या समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला.मात्र सद्यस्थितीत मागास प्रवर्गातील आश्रमशाळेतील योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असणारे प्रशासकीय अधिकारी आणि स्वार्थी आश्रमशाळा संचालक यांच्या आर्थिक लालसेपोटी विद्यार्थ्यांच्या मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असुन त्यांना शाळा प्रवेशासाठी होणा-या आनंदोत्सवात सुद्धा सहभागी करून घेण्याची आवश्यकता वाटत नाही. हे दुर्दैव असुन पुन्हा त्यांच्या पदरी निराशाच दिसून येत असल्याची खंत महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघाचे बीड जिल्हाध्यक्ष धनंजय सानप यांनी व्यक्त केली.

## शाळा-कॉलेज सुरू होताच रोड रोमिओचा त्रास

### पोलिसांनी रोमिओचा बंदोबस्त करावा-वर्षा शिंदे

पाटोदा। प्रतिनिधी

जिल्ह्यातील शाळा, कॉलेज तसेच खाजगी शिकवणी वर्ग (क्लासेस) सुरू होताच अनेक ठिकाणी विद्यार्थिनींची छेडछाड, पाठलाग, यांसारख्या घटनांमध्ये वाढ झाली असून विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सावता सेनेच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ. वर्षाताई शिंदे यांनी पोलिस प्रशासनाकडे ठोस उपाय योजनांची मागणी केली आहे.वर्षाताई शिंदे यांनी स्पष्टपणे सांगितले की, ''प्रत्येक तालुका ठिकाणी तात्काळ 'दामणी पथक' नेमण्यात यावेत. हे विशेष पथक शाळा, कन्या शाळा, महाविद्यालय परिसर तसेच क्लासेसजवळ व बस स्टॅन्ड आवारात नियमित गस्त घालून गैरप्रकारांना आळा घालतील. याशिवाय विद्यार्थिनींसाठी मदतीचे संपर्क क्रमांक बस स्टॅन्ड, शाळा, क्लासेस व कॉलेजमध्ये स्पष्टपणे लावण्यात यावेत.''त्यांनी पुढे सांगितले की, ''विद्यार्थिनी सुरक्षित असल्याशिवाय शिक्षण प्रक्रियेचा खरा उद्देश साध्य होणार नाही. पालकांमध्येही वाढत असलेली असुरक्षिततेची भावना लक्षात घेता पोलिस प्रशासनाने संवेदनशीलपणे तात्काळ कार्यवाही करावी.'' या मागणीसाठी सावता सेनेच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ. वर्षाताई शिंदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मागणी केली असून, जर कारवाई झाली नाही, तर विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी सावता सेना महिला आघाडी तीव्र पद्धतीने आंदोलन करतील असा इशाराही सावता सेनेच्या मराठवाडा विभागीय महीला अध्यक्षा सौ.वर्षा शिंदे यांनी यावेळी देण्यात आला आहे.

## विलास खरात यांची जमादार म्हणून पदोन्नती

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलिस म्हणून कार्यरत असलेले विलास खरात यांची पोलिस जमादार म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

गेल्या तीन चार वर्षापासून वडवणी पोलीस ठाण्याला पोलीस कर्मचारी म्हणून लाभलेले विलास खरात यांनी वडवणीत आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे सर्व परिचित झाले आहेत. विलास खरात यांनी बीड जिल्ह्यात नोकरी करत असताना आपल्या कामाच्या जोरावर सर्वांना आपलेसे करून सगळयात मिळून मिसळून राहून आपली कामे चोख करून आपल्या कार्याच्या जोरावर समाजात आपली चांगली छबी निर्माण केली आहे. त्यांच्या या मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी सर्वांचे मने जिंकले असून ते वडवणी पोलीस स्टेशनला कार्यरत असल्यापासून ते अत्यंत चाणाक्ष बुद्धीवान व चांगल्या काम करण्याच्या पध्दतीमुळे ते गेल्या दोन वर्षांपासून सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसाट यांच्या



कार्यकाळामध्ये त्यांचे रायटर म्हणून चांगले काम केले आहे. त्याचबरोबर आताही सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हागाडे-शिंदे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे चांगले कार्य असून ते सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी आहे. तरी त्यांना काल पोलीस जमादार म्हणून पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## थोडक्यात

### स्वामीसमर्थ केंद्र पाटोदा येथे उद्या योग शिबिर

पाटोदा । प्रतिनिधी

परमपूज्य गुरूमाऊलीच्या आर्शिवादाने २१ जुन रोजी जागतिक योगा दिना निमित्त आपल्या सर्वाच्या उत्तम आरोग्या साठी योग्या सनाचे महत्त्व सर्वाना कळावे व सर्वाना निरोगी उत्तम आरोग्य लाभावे या साठीच या शिबीराचे आयोजन परमपूज्य गुरूमाऊलीनी सर्व सेवा केंद्र निहाय करण्याचे आयोजन केले असून या निमित्त आपल्या पाटोदा सेवा केंद्रात पण योग्या शिबीराचे आयोजन केलेले असून सर्व सेवेकर्यानी या शिबीरासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे या शिबीर साठी खास बीड येथील आनुभवी व आभ्यासु प्रक्षीकशक येणार आहेत व खुप छान माहीती आरोग्य टिप्स देण्यार आहेत तरी सर्व सेवेकर्यानी एक तास आपल्या आरोग्या साठी देऊन जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून याचालाभ घ्यावी ही विनंती.

### अशोकराव बन्सीधर लोंढे यांचे निधन

बीड। प्रतिनिधी



दुकान नं.२४, बुरुड गल्ली कोपन दुकानदार अशोकराव बन्सीधर लोंढे यांचे सोमवार दि.१६ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुळ वातावरणात अमरधाम स्मशानभुमी येथे दि.१७ जून रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठीत नागरिकांसह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली असा परिवार आहे.

### मांजरा नदीच्या पुलावरील खड्डे दुरुस्त करून जाळी बसवली

पाटोदा : पाटोदा नगरपंचायत यांच्याकडे शहरातल्या नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी व महाराज मंडळींनी व व्यापाऱ्यांनी रस्ता व जाळी बसवण्याबाबत सांगण्यात आलं होतं याची दखल घेऊन आज मांजरा नदीवरील पूलावर रस्ता व जाळी बसवण्यात आली पाटोदा शहरात येणाऱ्या पालखी सोहळा च्या औचित्य साधून पाटोदा नगरपंचायत च्या व नॅशनल हायवे च्या सहकार्याने मांजरा नदीवर रस्ता व खड्डे दुरुस्त करून घेण्यात आले.

१० फूट उंच मांजरा नदीच्या पुलावर जाळी बसवण्यात आली पाटोदा शहरातील नागरिक कचरा व घाण नदीपात्रात टाकत होते. पाटोदा भागाशी जोडणारे एप्रोज रोड, बाजार तळ , पारगाव रोड, भीम नगर, पाटील गल्ली, भगवान परशुराम नगर हे देखील रोड करण्यात आले कर्तव्येशी प्रामाणिक नगरपंचायत कार्यालय पाटोदा उपनगराध्यक्ष, गटनेते, सभापती, नगरसेवक, पाटोदा धस,पाटोदा नगरपंचायत यांच्याकडे शहरातल्या नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी व महाराज मंडळींनी व व्यापाऱ्यांनी रस्ता व जाळी बसवण्याबाबत सांगण्यात आलं होतं याची दखल घेऊन आज मांजरा नदीवरील पूलावर रस्ता व जाळी बसवण्यात आली. पाटोदा शहरात येणाऱ्या पालखी सोहळा च्या औचित्य साधून पाटोदा नगरपंचायत च्या व नॅशनल हायवे च्या सहकार्याने मांजरा नदीवर रस्ता व खड्डे दुरुस्त करून घेण्यात आले १० फूट उंच मांजरा नदीच्या पुलावर जाळी बसवण्यात आली पाटोदा शहरातील नागरिक कचरा व घाण नदीपात्रात टाकत होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. विशाखा बी. पाटील ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ९२०/२०२५ दत्तात्रय अंकुश खोसे वि. निरंक**

अर्जदार : १. दत्तात्रय अंकुश खोसे, वयः ३७ वर्षे, धंदा शेती, रा तांदळवाडी घाट, ता.जि. बीड. ह. मु. फल्ट नं. १४, मयुरेश्वर रेसिडेन्सी, सूर्यनगरी, जळोची, भिगवन रोड, पुणे २. दिगांबर पि. अंकुश खोसे, वयः ३८ वर्षे, धंदा शेती, रा. तादळवाडी घाट, ता.जि बीड.

विरुध्द गैरअर्जदार निरंक

मागणी: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

या न्यायालयात मयत सोजरबाई भ्र. अंकुश खोसे, यांचे वारस असल्या बाबततचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केधला आहे. ज्याअर्थी सोजरबाई भ्र. अंकुश खोसे, मृत्यु दि. १४/०४/२०२४ रोजी राहत्या घरी मौजे तांदळवाडी घाट, ता.जि. बीड. येथे मयत झाल्या असून अर्जदार क्र १ व २ हे मयताचे मुले आहेत. मयताची पती यापूर्वीच मयत झालेले आहेत. मयतास मुलगी नाही यांना अर्जदाराव्यतिरिक्त इतर कुणीही वारस नाहीत असे अर्जात नमुद आहे.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि त्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत सोजरबाई भ्र. अंकुश खोसे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १९/०६/२०२५ रोजी माझ्या सहिने व. न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०७/२०२५ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरित
शिक्का
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९०२/२०२५**

**अ‍ॅड. तिपाले एस. जी.**

अर्जदार : महादेव पि.भगवानराव सोनवळकर वय ५२ वषै धंदा नोकरी रा. स्वराज्यनगर बीड.ता.जि.बीड

विरुध्द गैरअर्जदार :- निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे राधाबाई भ्र. भगवानराव सोनवळकर यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे राधाबाई भ्र. भगवानराव सोनवळकर, रा. स्वराज्य नगर, बीड ता. जि. बीड हे दिनांक ०६/०५/२०२२ रोजी बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हा मयताचा एकमेव मुलगा आहे. मयताचे पती यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारास इतर भाउ किंवा बहिण कोणीही नाही. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी

**पुढील दिनांक २३/०७/२०२५**

**आज दिनांक १९/०६/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

स्वाक्षरित
**क लिपीक**
शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## परळी शहर स्वच्छ करणाऱ्या कामगारांवर उपासमारीची वेळ-ॲड.संकाये

परळी। प्रतिनिधी

देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत, परळी नगरपरिषदेमार्फत स्वच्छता राखणाऱ्या २५० कंत्राटी कामगारांची आर्थिक अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. तीन महिने उलटून गेले तरी या कामगारांना वेतन मिळालेले नाही. परिणामी त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.



सुमारे २५० महिला आणि पुरुष कामगार खाजगी एजन्सीमार्फत रोजंदारीवर काम करत असून, त्यांना केवळ महिला कामगारांना दोनशे रुपये व पुरुष कामगारांना तीनशे रुपये इतकी तुटपुंज्या हजेरीप्रमाणे मजुरी दिली जात आहे. ही रक्कम किमान वेतन कायद्याच्या पूर्णपणे विरोधात असून, कामगारांची सरळसरळ आर्थिक पिळवणूक सुरू असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केला आहे. बुधवारी परळी नगरपालिका उपमुख्य अधिकारी संतोष रोडे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले आहे यावेळीकैलास रिकीबे ,प्रवीण रोडे, सुंदर आव्हाड ,वसंत मुंडे प्रमोद गिरी ,संतोष कांबळे, एस एस चौधरी ,वैजनाथ कांदे नामदेव कराड, सोमनाथ गीते राजेंद्र गायकवाड ,प्रकाश मस्के ,राम गडदे राम चाटे उपस्थित होते.

त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, ''शहर स्वच्छ ठेवणाऱ्या या कामगारांवर अन्याय सहन केला जाणार नाही. संबंधित खाजगी एजन्सीला तातडीने दरमहा नियमित वेतन देण्याचे आदेश द्यावेत. शिवाय, मजुरीत त्वरित वाढ करावी. अन्यथा नगरपरिषदेसमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल.'' गेल्या अनेक वर्षापासून तीन-तीन महिन्याला कंत्राटदार हा पेमेंट करतो कधीही दर महिन्याला करीत नाही. त्यामुळे स्वच्छता कामगारांनी आपला उदरनिर्वाह कसा भागवावा असा प्रश्न आहे.या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घेऊन प्रशासनाने न्याय दिला नाही, तर आंदोलन करण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## केएसके कृषी कन्यांनी पेरणीसाठी मुहूर्त व नक्षत्राचे सांगितले महत्त्व

बीड। प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी मान्यताप्राप्त श्री अनंत कृषी विकास प्रतिष्ठान ,बीडच्या सौ.के .एस .के .(काकू) कृषी महाविद्यालयातील कृषी कन्यांनी खरीप हंगामात बियाणे पेरणीसाठी मुहूर्त व नक्षत्रांचे महत्त्व हे काय आहे शेतकऱ्यांना पटवून दिले. नक्षत्राचा पिकाच्या चांगल्या वाढीवर होणारा परिणाम काय आहे याबद्दलच्या सर्व गोष्टी गावकऱ्यांसोबत चर्चा केली .भारतीय कृषी परंपरेत पेरणीसाठी मुहूर्त व नक्षत्रांचे विशेष महत्त्व आहे. हजारो वर्षापासून चालत



आलेल्या पंचांग शास्त्रानुसार विशिष्ट नक्षत्रामध्ये पेरणी केल्यास पीक उगम ,वाढ, फुलोरा ,व उत्पादन या सगळ्या टप्प्यांवर सकारात्मक परिणाम होतो. पावसाळ्याची चाहूल लागल्यानंतर योग्य दिवस निवडून बीज पेरणी केली जाते. या दिवसाला पेरणीचा शुभमुहूर्त मानला जातो .मुहूर्तानुसार वातावरणातील तापमान, आद्रता ,वारेची दिशा यासारखे घटक पीक वाढीसाठी पोषक ठरतात. त्यामुळे उगम टक्केवारी चांगली येते आणि पीक रोगमुक्त राहते. प्राचीन भारतीय पंचांगात २७ नक्षत्रांची माहिती दिली आहे .त्यापैकी काही नक्षत्रांनाच शेतीसाठी अनुकूल मानले जाते जसे की मृगशिरा ,पुनर्वसू ,पुष्य ,श्रवण, रोहिणी ,स्वाती ,धनिष्ठा इत्यादी. अशाच काही मुद्द्यांवर शेतकऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली व पेरणीसाठी मुहूर्त व नक्षत्रांचे महत्त्व त्यांच्यासमोर स्पष्ट करण्यात आले. याप्रसंगी कृषी कन्या चव्हाण असवरी, डोके आरती , परजणे गीताश्री ,परजणे वैष्णवी , पवळ साक्षी, उगले सुप्रिया, पवळ उषा या उपक्रमासाठी उपस्थित होत्या. हा उपक्रम यशस्वीरित्या करण्यासाठी संस्थेचे सहसचिव डॉ. जी. व्ही . साळुंके,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस .पी .मोरे कार्यक्रम समन्वयक डॉ. एस .टी .शिंदे ,प्रा. एस .व्ही .राठोड यांनी मार्गदर्शन केले व हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

**टीसी हरवला आहे**

**कु.राणी रामभाऊ गवते या नावाचा इयत्ता ९ वी पास चा टीसी नारायणगड ते बेलुरा या प्रवासादरम्यान हरवला आहे मिळाल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा**

**संपर्क**
**९३७१६७८५८३**

**टीसी हरवला आहे**

**कु. स्वाती रामभाऊ गवते या नावाचा इयत्ता ९ वी पास चा टीसी नारायणगड ते बेलुरा या प्रवासादरम्यान हरवला आहे मिळाल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा**

**संपर्क**
**९३७१६७८५८३**

## दूरदृष्टीच्या पोलिस अधीक्षकांनी नागरिक व पोलिसांचा सुसंवाद घडवून आणावा

### परळी वैजनाथ येथे जनसंवाद बैठकीचे आयोजन करावे; राजेभाऊ फड यांचे पोलिस अधीक्षकांना निवेदन

परळी । प्रतिनिधी

नागरिकांची सुरक्षा तसेच कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस प्रशासनाचा वचक असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शाहजी उमाप, पंकज कुमावत, विशाल आनंद यांच्यासारख्या अनेक अधिकाऱ्यांनी आपल्या कामाचा दरारा निर्माण करून जनतेच्या मनावर एक वेगळी छाप निर्माण केलेली आहे. त्याचप्रमाणे आत्ताचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनीही पोलिस दलात आमूलाग्र बदल केल्याने पूर्वीच्या आणि आत्ताच्या परिस्थितीत मोठा बदल दिसून येत आहे. जिल्ह्यातील गुन्हेगारी आणि अवैध प्रकारांना मोठ्या प्रमाणावर पायबंद झाल्याचे दिसून येत आहे. परळी वैजनाथसारख्या सर्वांगाने महत्त्वपूर्ण असलेल्या शहरात गुन्हेगारी कमी करण्यासाठी तसेच शांतता प्रस्थापित करण्यासाठी नागरिक आणि पोलिस यांचा सुसंवाद असणे अत्यंत गरजेचे असल्याने जिल्हा पोलिस अधीक्षकांनी परळीत लवकरच व्यापक जनसंवाद बैठक आयोजित



करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पोलिस अधीक्षकांना निवेदन पाठवले असून त्याद्वारे त्यांना विनंती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी बीड जिल्हा पोलिस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परळी शहर हे अनेक अर्थाने म्हणजेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक आणि दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. येथील कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने अनेक प्रश्न नेहमीच उपस्थित केले जातात, त्याच्या चर्चा मिडिया आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून केल्या जातात. अनेक प्रकारचे अवैध धंदे, व्यसनाधीन होत चाललेले बालक आणि तरुण व त्यातून वाढत चाललेली गुन्हेगारी ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यातच महिला आणि मुलींचे प्रश्न वेगळे आहेत. या सर्व प्रश्नांशी आपल्याला अवगत होणे अत्यावश्यक बाब आहे. सर्वसामान्य नागरिक, महिला, मुली आणि विद्यार्थी यांना आपल्याशी मुक्त संवाद साधता यावा. तसेच परळीच्या व्यापारी बांधवात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना नष्ट व्हावी. श्रावण महिन्यात लाखो भाविक वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनाला येत असतात, सुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांच्या काय सूचना आहेत त्याचे संकलन करणे तसेच त्यांना त्यांचे प्रश्न आपल्यासमोर मोकळेपणाने मांडता यावेत यासाठी आपण परळी वैजनाथ येथे लवकरच एक मुक्त जनसंवाद बैठक आयोजित करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# भाजी मंडईतील रस्त्यावर फळ विक्रेत्यांचे अतिक्रमण

## वाहतुकीला मोठा अडथळा; रस्त्यावर गाडे लावल्याने वाहनचालक वैतागले



बीड । प्रतिनिधी

शहरातील भाजीमंडई -बजीरगंज रस्त्यावर फळविक्रेते व इतर साहित्यांचे विक्रेते हे रस्त्याच्या कडेला वाहतुकीला अडथळा होणार नाही, अशा पध्दतीने गाडे थाटून आपला व्यवसाय करतात. मात्र काही विक्रेते हे रस्त्यातील वाहतुकीला अडथळा होईल अशा प्रकारे आपले गाडे लावत असल्याने वाहनधारक आता वैतागले असून दोन चारचाकी वाहने आल्यावर वाहतूक कोंडी होत आहे.

बीड शहरातील भाजीमंडई भागातील मुख्य रस्त्यावर नेहमीच गद असते. हा रस्ता पाहिजे तेवढा मोठा नाही. तसेच या रस्त्यावर फळ विक्रेते व इतर साहित्याची विक्री करणारे आपले गाडे लावून अतिक्रमण करीत असल्याचे सध्या चित्र आहे. या मुख्य रस्त्यावर आंबे विक्रेते, आग्रा पेठा विक्रेते व इतर साहित्याची विक्री करणारे व्यवसायिक आपले गाडे हे रस्त्यात वाहतुकीला अडथळा निर्माण होईल, अशा प्रकारे लावत आहेत. दोन चारचाकी वाहने समोरासमोर आल्यावर त्यांना जाता न आल्याने वाहतुक बराच वेळ ठप्प होत आहे. त्यामुळे वाहतुक शाखा आणि नगर पालिकेने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होऊ लागली आहे.

### नगर पालिकेचे पुर्णत: दुर्लक्ष

भाजी मंडईत छोटे-छोटे व्यवसायिक आपले गाडे थाटून त्याठिकाणी व्यवसाय करीत आहेत. यातील काहीजण नियम धाब्यावर बसवून रस्त्यावर आपले गाडे लावून वाहतुकीला अडथळा निर्माण करीत आहेत. अशा व्यवसायिकांवर कारवाई करण्याची जबाबदारी ही नगरपालिकेची असताना याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

# पाऊस लांबला; शेतकऱ्यांच्या खरीप पेरण्या खोळंबल्या

## यंदा बाजरी, सोयाबीनसह मुगाचे क्षेत्र घटण्याची शक्यता





**ज्योतीराम पाढरपोटे । माजलगाव**

जून महिना निम्मा सरत आला तरी पावसाने तोंड न दाखवल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. मान्सूनपूर्व पावसानेही हाजेरी लावल्याने शेतकऱ्यांची खरीप पेरणीपूर्वी शेतातील मशागतीची कामे रखडली होती.काही शेतकऱ्यांनी मान्सुनपुर्व पावसावरच कापुस लागवड केली आहे.परंतु अद्याप पर्यंत मन्सुनचा पाऊस न झाल्याने परिणामी, खरीपाच्या सोयाबीन, बाजरी व मुगाच्या पेरणीवर परिणाम झाला आहे.आठ दिवसांत पेरणी न झाल्यास हा पेरा करता येणार नाही.

माजलगाव तालुक्यात तूर, मूग, सोयाबीन, बाजरीसह कापूस आदी पिके घेतली जातात. रोहिणी नक्षत्रात मान्सूनपुर्व अवकाळी तुरळक पावसाने हजेरी लावल्याने मृग नक्षत्रातही अद्याप समाधानकारक पाऊस झाला नाही. उकाड्याची तीव्रताही प्रचंड वाढली आहे. पावसाने हजेरी न लावल्याने खते, बियाण्यांच्या बाजारातील उलाढाल मंदावली आहे.कृषी दुकानदारांच्याही तोंडचे पाणी पळाले आहे. शेतकरी आणखी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. ◀◀ पान ३ वर

शेतकरी पावसाच्या भरवशावर मूग,तूर, बाजरी, कापुस, सोयाबीनची पेरणी करतात. मात्र, मान्सुनचा पाऊस लांबल्याने बियाणे खरेदीसाठी येण्याचे प्रमाण तुरळक आहे.त्यामुळे शेतकऱ्यांसोबत दुकानदारही मान्सुनचा पावसाची वाट पाहत आहेत. पाऊस झाला तरच बाजारपेठेत उलाढाल होईल, असे एका कृषी सेवा केंद्राच्या दुकानदाराने दैनिक राज्य लोकतंत्र शी बोलताना सांगितले.



गेवराई - शहरातील न्यू निसर्ग हॉटेल येथे शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांच्यासमवेत शिनूभाऊ बेदरे, दिलीप गिरे, आबा गायकवाड , शंकर वैद्य , आकाश गिरे , माऊली बेदरे , ओम गायकवाड , नंदकुमार जोगदंड सह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# मन्मथ स्वामी समाधीस्थ, पण व्यवस्थेच्या बेफिकिरीत श्रीक्षेत्र कपिलधार बेहाल!

## श्रीक्षेत्र कपिलधारमधील अराजक कारभाराने श्रद्धास्थळ धोक्यात, ग्रामस्थ आणि भाविकांमध्ये तीव्र संताप

बीड । प्रतिनिधी

संपूर्ण देशाचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र कपिलधार हे आज अराजकतेच्या खाईत लोटले जात आहे. लिंगायत समाजाचे धर्मगुरू संत शिरोमणी मनमत स्वामी महाराज यांची संजीवन समाधी लाभलेली ही भूमी, निसर्गसौंदर्याने नटलेली असूनही, सध्या विश्वस्तांच्या वादामुळे आणि बिनधास्त विकासकामांमुळे गंभीर संकटात सापडली आहे असे अनेक आरोप ग्रामस्थानांकडून होताना दिसत आहे.

श्रीक्षेत्र ◀◀ पान ३ वर



### श्रद्धेचं स्थान नव्हे तर संघर्षभूमी?

श्रीक्षेत्र कपिलधार हे भावनांचं केंद्र आहे. मात्र सध्या तिथे चाललेले गोंधळ, वाद, पर्यावरणाची हानी आणि अव्यवस्था यामुळे हे श्रद्धास्थान संघर्षभूमी वाटू लागले आहे. शासनाने वेळेत लक्ष घातले नाही, तर एक ऐतिहासिक व धार्मिक वारसा नामशेष होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# धानोरा खु. येथे महिलांची सोयाबीन व ऊस शेतीशाळा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

सुधारित कृषी तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी शेतीशाळा हे प्रभावी माध्यम असल्याने तसेच शेती व्यवसायामध्ये महिलांचा मोलाचा वाटा असल्याने कृषी विभागाने महिलांच्या शेतीशाळा घेण्यावर विशेष भर दिलेला आहे. कृषी विषयक नवीन तंत्रज्ञानाची माहिती महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि नॅचरल शुगर रांजणी यांच्या संयुक्त विद्यमाने कृषिरत्न बी. बी ठोंबरे, उपविभागीय कृषी अधिकारी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे व ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी धानोरा खुर्द येथे महिलांची शेतीशाळा घेऊन मार्गदर्शन ◀◀ पान ३ वर

# माजलगाव शहर पोलीसांचा जुगार आड्यावर छापा

## ८ जुगारी ताब्यात,५० हजाराचा मुद्देमाल जप्त

**माजलगाव । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे माजलगाव शहर हद्दीतील गौतमनगर भागात काही इसम अवैद्यरीत्या जुगार खेळत आहेत अशी गोपीनय माहीती मिळाल्याने दि १८ जुन बुधवार रोजी सदर ठिकाणी सायंकाळी ०७:४० वाजण्याच्या सुमारास पोलीस कर्मचाऱ्यांसह व पंचासह छापा मारला असता आठ इसम रमी जुगार खेळत असताना मिळुन आले. तसेच त्यांचे ताब्यात जुगाराचे साहीत्य व नगदी रुपये व मोबाईल असा एकुण ५०,८१०/- रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करुन आठ आरोपीतां विरुध्द माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरनं २२३/२०२५ कलम १२ (अ)




महाराष्ट जुगार.कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई नवनीत कॉवत पोलीस अधिक्षक बीड,चेतना तिडके अपर पोलीस अधिक्षक आंबाजोगाई, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग आंबाजोगाई,यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ पोलीस ठाणे माजलगाव शहर पोलीस उपनिरीक्षक संदिप राठोड, पोशि/२२२२ गवळी, पोशि/१९५८ मिरकले यांनी केली आहे.

# ईडा पिडा टळो अन् बळीचे राज्य येवो!

## सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती गोरे यांनी शेतात पेरणी करुन शेतकऱ्यांचे वाढविले मनोबल

**केज । दुर्गादास लांब**

उसनवारी करुन काळ्या आईची ओटी भरली मात्र म्हणावे तसं उत्पादन न निघाल्याने शेतकरी नैराश्यात जातात. मात्र वास्तविक पाहता तंत्रशुद्ध पद्धतीने शेती केल्यास भरघोस उत्पादन होवून उत्पन्न मिळते. हे बहुतांश शेतकर्यांना आजही माहित नाही. केवळ पारंपारीक शेतीवरच शेतकरी अवलंबून असतात. यंदा मात्र बळीराजाला सुखाचे दिवस यावेत. यासाठी कृषी विभाग पुढे सरसावल्याचे दिसते. केज तालुक्यातील भाटुंबा येथे तालुका कृषी कार्यालयातील कृषी सहाय्यक श्रीमती गोरे यांनी थेट शेतात जावून पेरणी करुन पीकांना रसायनिक खतांची मात्रा या संबंधी माहिती देत मार्गदर्शन करत शेतकर्यांचे मनोधैर्य वाढविले. त्यांच्या या कृतीमुळे ईडा पिडा टळो अन्? बळीचे राज्य येवो याचीच प्रचिती शेतकर्यांना येतांना दिसून आली.

यंदा मान्सूनचे लवकरच आगमन झाल्याने बळीराजा सुखावला असून खरीप हंगामाच्या कामात शेतकरी व्यस्त आहेत. परंतू शेतकर्यांना योग्य मार्गदर्शन लाभत नसल्याने उत्पादनात मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागते. त्यामुळे



यंदा कृषी विभागाने खरीप हंगाम मोहीम ३० कलमी कार्यक्रम राज्यात हाती घेतला आहे. या माध्यमातून कृषी विभागातील अधिकारी थेट शेतात जावून बी-बियाणे, पीकांवरील खतांची मात्रा याविषयी मार्गदर्शन करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून केज तालुका कृषी विभागातील सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती गोरे यांनी भाटुंबा शिवारातील शेतात जावून शेतकर्यांना उताराला आडवी पेरणी, मूलस्थानी जलसंधारण, कृषी निविष्ठांचा योग्य वापर व कृषी यांत्रिकीकरण याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी शेतकरी कचरू धपाटे, धनराज धपाटे, लक्ष्मण धपाटे व इतर महिला शेतकरी उपस्थित होते. त्यांच्या या कृतीमुळे ईडा पिडा टळो अन्? बळीचे राज्य येवो याचीच अनुभूती शेतकर्यांना येतांना दिसून आली. मात्र एरव्ही अधिकारी-कर्मचारी वर्ग शेतकर्यांच्या बांधावर तसा फिरकत नाही. मात्र दोन-चार दिवसांपूर्वी दस्तुरखुद्द जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शेतकर्यांच्या शेतात जावून पेरणी केल्यामुळे शेतकर्यांमध्ये अधिकारी असा तर कलेक्टर साहेबांसारखा जो शेतकर्यांचे कष्ट आणि व्यथा जाणून घेतात. त्यामुळे अन्य अधिकारी-कर्मचारी सुद्धा शेतकर्यांच्या शेतात जातांना पाहायला मिळत आहेत. यामुळे शेतकर्यांचे मनोधैर्य वाढू लागले असून बळीराजाला निश्चित सुखाचे दिवस येतील यात मात्र शंका नाही.

# धारूर येथील मरजीदच्या जमिनीत घोटाळा

## खिदमस मासच्या ४४ एकर पैकी २२ एकरची बेकायदेशीरपणे विक्री

**धारूर । प्रतिनिधी**

**धारुर येथील मस्जीदची खिदमत मास ईनामी जमीन सर्व्हे नं. ६१० व ५५६ बेकायदेशीर खेरदीखत करणार्यावर कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि सादिक बाबामिया ईनामदार यांनी केली आहे. याबाबत त्यांनी वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समिर काझी आणि बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना लेखी पत्र दिले आहेत. सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी यांनी सादिक इनामदार यांचे पत्र स्विकारले आहे.**

किल्ले धारूर येथील सर्व्हे नं. ६१० व ५५६ ही जमीन मस्जीदची खिदमत मास ४४ एकर जमीन असून ती त्या पैकी असद जिलानी कुरेशी यांनी ९९ वर्षाचा कौलनामा ४४.००००० लक्ष रुपयांमध्ये २२ एकर जमीन प्रति एकर २,००००० रुपये प्रमाणे बेकायदेशीर विकत घेतलेली आहे. ती पूर्णपणे बेकायदेशीर असून शासनाची फसवणूक करुन बॉन्डवरती नोटरी करुन करार केलेला आहे. वक्फ अधिनियम १९९५ च्या कायद्यान्वये खरेदी करणारे असद जिलानी कुरेशी यांच्या वरती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. सादिक बाबामिया ईनामदार यांनी केली आहे. अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असाही ईशारा यावेळी त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिला आहे.



जमिन घेणाऱ्या असद जिलानी कुरेशींवर कायदेशीर कारवाई करा; सादेक इनामदारांची वक्फचे अध्यक्ष, जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

# अंबाजोगाई शहरातील वीज ग्राहकांचे बदलण्यात येणारे स्मार्ट मीटर बदलणे तात्काळ थांबवून शहरातील वीज पुरवठा सुरळीत करावा- राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील वीज ग्राहकांच्या परवानगी शिवाय बदलण्यात येणारे नवीन स्मार्ट मीटर बसविणे त्वरित थांबवावे तसेच वीज बिलात विविध प्रकारच्या आकारण्या लावून ग्राहकांची केली जाणारी आर्थिक लूट थांबवावी त्याचबरोबर ग्राहकांना येत असलेली ज्यादा वीज बिल ते दुरुस्त करून बिले कमी करून देण्याची मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी कार्यकारी अभियंता महावितरण यांच्याकडे एका निवेदनाद्वारे



केली आहे.

दिलेल्या निवेदनानुसार अंबाजोगाई शहरात अचानक पणे ग्राहकांच्या परवानगीशिवाय त्यांचे चालू असलेले जुने मीटर काढून त्याठिकाणी स्मार्ट मीटर बसवण्याचे काम चालू आहे. बसविण्यात येणाऱ्या स्मार्ट मीटर विषयी ग्राहकांना कुठलीही माहिती दिल्या जात नाही. त्यामुळे जुने मीटर काढून नवीन मीटर का बसविले जात आहे हा प्रश्न वीज ग्राहकात निर्माण झाला आहे. यामुळे शहरातील वीजग्राहकात मोठया प्रमाणावर नाराजी तथा गैरसमज निर्माण होत असल्याचे चित्र सर्वत्र निर्माण झाले आहे.जुन्या मीटरची रीडिंग नवीन मीटर च्या बिलात देत असताना जुन्या व नवीन रीडिंगचा ताळमेळ कुठेच लागत नाही. पर्यायाने शहरातील वीज ग्राहकांना ज्यादा बिलाची आकारणी केल्या जात आहे त्यामुळे ग्राहकांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

यापुढे ग्राहकांना त्यांचे वीज बिल देतांना योग्य ती काळजी घेऊन ग्राहकाचे समाधान करून बिल द्यावे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...



# पिंपरी पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकांना मिळणार सर्व प्रकारची तात्काळ मदत

## पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या कल्पणेतून मोबाइल ॲप्लिकेशन विकसीत

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना आता पोलिसांची मदत तात्काळ मिळणार आहे. ज्येष्ठ नागरिकांनी नियंत्रण कक्षाला कॉल केला लगेच त्यांची वैयक्तिक आणि वैद्यकीय माहिती डॅशबोर्डवर दिसून येणार आहे, ज्यामुळे पोलिसांना त्यांची आरोग्य स्थिती, आवश्यक मदतीचा प्रकार आणि त्यांचे वर्तमान स्थान काही सेकंदात समजू शकेल. ज्या आधारावर पोलिस तात्काळ मदत करतील.ङ्गपोलिस आयुक्त विनय कुमार चौ यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी समर्पित मोबाइल ॲप्लिकेशन तयार करण्याचे नेतृत्व केले आहे. डॉ. शिवाजी पवार यांनी शहरातील एका खासगी विद्यापीठाच्या मदतीने हे ॲप विकसित केले आहे. सध्या, ज्येष्ठ नागरिकांना पारंपरिक पद्धतींचा वापर करून ज्येष्ठ नागरिक कक्षाद्वारे मदत केली जाते, जिथे फोन कॉल्स दरम्यान त्यांचे तपशील घेतले जातात आणि आवश्यकतेनुसार पोलिस अधिकारी तैनात केले जातात. तथापि, तंत्रज्ञानाचा लाभ घेणारे हे





नवीन ॲप पोलीस ज्येष्ठ नागरिकांच्या निवासस्थानी जाऊन आवश्यक माहिती संकलित आणि अपडेट करतील. नोकरीसाठी किंवा अन्य कारणांसाठी मुले स्थलांतरित झाल्यामुळे एकटे राहणाऱ्या वृद्ध लोकांच्या वाढत्या संख्येने प्रेरित होवून हे विकसीत करण्यात आले आहे. मदत पुरवण्याच्या पारंपारिक पद्धतींमुळे अनेकदा विलं होतो तो होऊ नये या ॲपचा मुख्य उद्देश आहे.

आपत्कालीन परिस्थितीत वृद्ध व्यक्तींसाठी औषधे, जवळपासची रुग्णालये किंवा इतर गरजांसाठी संपर्क क्रमांक शोधणे अनेकदा आव्हानात्मक असते. या ॲपद्वारे, सर्व सहाय्य फक्त एका क्लिकवर सहज उपलब्ध होईल. या ॲप्लिकेशनमध्ये सरकारी योजना, ते कसे आणि कोठे ॲक्सेस करायचे, आणि संबंधित संपर्क क्रमांक याविषयी तपशील देखील प्रदान केला जाईल. याव्यतिरिक्त, यात पोलिसांशी थेट संवाद साधण्यासाठी एक समर्पित बटण समाविष्ट आहे. कॉल मिळाल्यावर, डॅशबोर्ड कॉलरचे छायाचित्र आणि त्यांचे सर्व तपशील प्रदर्शित करेल, पोलिसांना मदतीचा प्रकार त्वरित समजेल याची खात्री करून. एक ''आवडता'' पर्याय सादर करण्यात आला आहे, जो वापरकर्त्यांना त्यांच्या पसंतीचे डॉक्टर आणि रुग्णालये निवडण्याची परवानगी देतो. जेव्हा मदतीची विनंती केली जाते, तेव्हा पोलिस नियुक्त हॉस्पिटल, फार्मसी आणि डॉक्टरांशी संपर्क साधून तात्काळ मदत पुरवतील. पोलिसांनी या उपक्रमाद्वारे वृद्धांसाठी विश्वासार्ह पाऊल उचलले असून, याचे सर्वत्र कौतूक होत आहे.

पोलिस अधिकाऱ्यांकडून ज्येष्ठ नागरिकांना प्रशिक्षणङ्गकाळेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांच्या अध्यक्षतेखाली सहायक पोलीस निरीक्षक रिना कोरडे, पोलीस निरीक्षक (क्राइम) महाले, दीपक गायकवाड यांच्या पथकाने पिंपळे सौदागर, काळेवाडी, रहाटणी येथील फाइव गार्डन कोआपरेटिव हाउसिंग सोसायटी, स्वीस काउंटी, रोज वुड अश्या सोसायटींमध्ये जावून ज्येष्ठ नागरिकांना प्रशिक्षण दिले. यामध्ये सदर ॲप कशा पद्धतीने वापरावयाचे आणि याचे काय फायदे आहेत हे नागरिकांना समजावून सांगण्यात आले.

# भोर तालुक्यात पावसाची पुन्हा दमदार हजेरी; पेरणी केलेल्या शेतातच पाणी

भोर : भोर तालुक्यात अवकाळी पावसाच्या विश्रांतीनंतर खरीप हंगामातील रखडलेल्या मशागतीच्या कामाला सुरुवात करुन खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीला लगबग करत शेतकऱ्यांनी दोन ते तीन दिवसात बहुतांश पेरणी केली. मात्र, त्यानंतर पावसाने सलग पाच ते सहा दिवसांपासून जोरदार सुरुवात केली आहे. परिणामी, पेरणी केलेल्या शेतात पाणी साचले, भात तरवे पाण्याखाली बुडाले तर मशागत केलेल्या जमिनीचा वाफसा गेला. त्यामुळे बहुतांश शेतजमीन पेरणीविना रखडल्याने खरीप हंगाम वाया जाण्याची चिंता शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

मागील आठवड्यात पेरणी केलेली पिके सध्या उगवण होऊन जोमात येऊ लागली आहेत. मात्र, उगवलेल्या पिकांमध्ये पाणी साचल्याने पिके वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना लागून राहिली आहे. एकीकडे मागील १५-२० दिवसांपूर्वी पाऊस थांबेना, म्हणून अडचणीत आलेला शेतकरी पावसाच्या विश्रांतीनंतर थोड्या फार प्रमाणात खरीप हंगामातील पेरणी केल्यानंतर सध्या पाऊस थांबेना म्हणून अडचणीत आल्याने हवालदिल झाला आहे.



# भाजपकडून बिडकरांकडे निवडणूकीची धुरा ?

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या पुणे शहराध्यक्ष पदासाठी प्रमुख दावेदार असूनही अंतिम क्षणी संधीपासून वंचित राहिलेल्या माजी गटनेते गणेश बिडकर यांच्याकडे आगामी पुणे महापालिका निवडणुकीच्या नियोजनाची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली असून बिडकरांकडून कामही सुरू करण्यात आले आहेत.तर बिडकर यांच्याकडून महापालिकेच्या माजी नगसेवकांसोबत चर्चा सुरू केली असून प्रभाग रचना, निवडणूकीची तयारी तसेच प्रभागातील समिकरणे जाणून घेतली जात आहेत.तर बिडकर यांच्याकडे ही जबाबदारी थेट देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनच देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.



भाजपच्या शहराध्यक्षपदासाठी बिडकर यांचे नाव आघाडीवर होते. पालिकेतील त्यांचा अनुभव आणि आगामी निवडणुकांचे महत्त्व लक्षात घेता त्यांची वर्णी लागेल, असे बोलले जात होते. मात्र अंतर्गत राजकीय समीकरणे आणि तडजोडीमुळे त्यांना बाजूला ठेवण्यात आले. त्यांना मोठी जबाबदारी दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे, राज्यात सत्ता स्थापनेनंतर बिडकर यांची विधानपरिषदेवर वर्णी लागण्याची शक्यताही वर्तविली जात होती.मात्र, त्या ठिकानीही संधी न मिळाल्याने शहराध्यक्ष म्हणून त्यांचे नाव आघाडीवर होते. मात्र, पक्षाने माजी शहराध्यक्ष धीरज घाटे यांना काम ठेवत सर्वांनाच धक्का दिला.

त्यातच, बिडकर यांनी महापालिकेत स्थायी समिती अध्यक्ष आणि २०१७ मध्ये सभागृहनेते पदाची जबाबदारी सांभाळली असल्याने आता बिडकर यांच्याकडे थेट महापालिकेची रणनीती आखण्याचे काम सोपविण्यात आले आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या फूटीनंतर दोन्ही पक्ष भाजप समवेत राज्यात सत्तेत असून पुण्यात या दोन्ही पक्षांकडून महायुती म्हणून लढण्याचा आग्रह आहे. त्यामुळे महापालिकेच्या कामकाजाचा प्रदिर्घ अनुभव आणि स्थानिक राजकारणात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या बिडकरांची भूमिका या निवडणूकीत महत्वाची ठरण्याची चिन्हे आहेत.

# पंढरपूर वारीसाठी मोफत औषध सेवा; उपक्रमात लोकसहभागातून औषधसंग्रह



**चिंचवडगाव । प्रतिनिधी**

पंढरपूर वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी मोफत औषध सेवा देण्याच्या उपक्रमांतर्गत 'वुई टुगेदर फाउंडेशन', 'चैतन्य फार्मा ग्रुप' यांच्या वतीने मोठ्या प्रमाणावर औषधसंग्रह करण्यात आला. गेली १६ वर्षांपासून सातत्याने राबवला जाणारा हा उपक्रम यंदाही लोकसहभागातून पार पडला.

औषध सुपूर्तीचा कार्यक्रम चिंचवड येथील यशस्वी क्लासेस हॉलमध्ये पार पडला. या वेळी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, प्रांत कार्यकारिणी सदस्य हेमंत हरहरे, ड. मोरेश्वर शेडगे, महेश कुलकर्णी, अजित कुलथे, रवी देशपांडे, नंदू भोगले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजक व फाउंडेशन अध्यक्ष मधुकर बच्चे यांनी उपक्रमाची माहिती दिली. यावेळी अजय दर्डा, मोहन कुलकर्णी, शंकर गावडे, मारुती हाके, मंगला डोळे-सपकाळे, रवींद्र सागडे, रोहिणी बच्चे, सोनाली मन्हास, जयंत कुलकर्णी आदींचा सहभाग होता. गोविंद देशपांडे, डॉ. शर्वरी एलगट्टिवार यांच्यासह विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी औषधं स्वीकारली. मंगला डोळे-सपकाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर जयंत कुलकर्णी यांनी आभार मानले.

# कुरुळी येथे तुकाराम महाराज पालखी दिंडी सोहळ्याचे उत्साहात प्रस्थान

**चिंबळी । प्रतिनिधी**

आषाढी वारीनिमित्त कुरुळी (ता. खेड) येथील विठ्ठल रुक्मिणी सांप्रदायिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित तुकाराम महाराज पालखी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान बुधवारी (दि. १७) दुपारी १२ वाजता झाले. गेल्या सतरा वर्षांची परंपरा जपत हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला.

जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शांताराम सोनवणे, दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष गुलाब सोनवणे, सरपंच, उपसरपंच आणि सर्व मान्यवरांच्या हस्ते दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी मंदिरात आरती आणि विणा



पूजन करण्यात आले. टाळ-मृदंगांच्या गजरात महिलांनी डोक्यावर तुळशी वृंदावन आणि खांद्यावर झेंडा घेऊन गावातून दिंडी मिरवणूक काढली.

स्वर्गीय सुलोचना सोनवणे यांच्या स्मरणार्थ ह.भ.प. सत्यवान सोनवणे यांच्या वतीने सर्व वारकरी आणि भाविकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. पावसाळी वातावरण लक्षात घेता, माजी उपसरपंच व माजी चेअरमन आशिष मुंढे यांनी सर्व भाविकांना रेनकोट वाटप केले. उपस्थित मान्यवरांनी सर्व वारकऱ्यांचे स्वागत केले.

# माळेगावला धाडसी कामगिरीची छाप असणारा चेअरमन मिळणार

**माळेगाव । प्रतिनिधी**

मेगा प्लॅनद्वारे माळेगाव कारखाना विकासाच्या मार्गावर आणणार आहे. माळेगावचा चेअरमन म्हणून मी खुर्चीत बसल्यानंतर खंबीर निर्णय घेण्यासाठी तत्पर राहणार आहे. निवडून येणार्या संचालक मंडळासह सभासदांनी अशा चेअरमनला काम करण्याची संधी द्यावी.

राज्याच्या कानाकोपऱ्यात कोठेही असलो तरीही माळेगावबाबत कामाचा ठसा उमटविल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे माळेगावला धाडसी कामगिरीची छाप असणारा चेअमरन मिळणार आहे, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

माळेगाव (ता. बारामती) सहकारी साखर कारखाना निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर अजित



पवार आज निळकंठेश्वर पॅनेलच्या प्रचारार्थ सभासद व कार्यकर्त्यांशी संवाद साधताना बोलत होते. माळेगावचा चेअरमन मी स्वतः (अजित पवार) होणार आहे, अशी घोषणा पुन्हा अजित पवार यांनी केली. त्यांनी सभासदांच्या ऊसाला सोन्याचे दिवस आणल्याशिवाय राहणार नाही असे सांगितले.

ते म्हणाले, ऋमाळेगावचा यापुढील काळात कारभार पुर्ण पारदर्शक असणार आहे. ऊस शेतीला खर्चाच्या तुलनेत बाजारभाव देण्यासाठी आम्ही कायम तत्पर राहणार आहे. शिवाय जिल्हा बँकेच्या माध्यमातून शून्य टक्के व्याजाने अधिकाधिक शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यास कटिबद्ध आहे.

तसेच उद्योग व्यवसाय, शिक्षणासाठीही कर्ज पुरवठा करण्यास आम्ही कोठेही कमी पडणार नाही. यापुढील काळात शेतकरी सभासद केंद्र स्थानी ठेवून माळेगावचा सर्वांगिण विकास करणार आहे. गुणवत्तेच्या जोरावर अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामाची अधिकाधिक चांगली संधी कारखान्यात दिली जाणार आहे.ऋ


ऋमाळेगावच्या कार्यक्षेत्रात अर्थिक सुबत्ता आणण्यासाठी एआय सारख्या तंत्रज्ञानाचा प्राचार व प्रसार मी शासनस्तराव करणार आहे. बारामतीकरांसह सर्वांना माहिती आहे, याआगोदर कृती उत्पन्न बाजार समिती, दूध संघ, जिल्हा बँक आदी सहकारी संस्थांचा कारभार माझ्या अधिपत्याखाली चांगला झालेला आहे. त्यामुळे माझ्या कर्तबगारीचा झेंडा माळेगाववर उभारण्यासाठी निळकंठेश्वर पॅनेलचे कपबशी चिन्हावर निवडणूक लढणारे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून देणे अपेक्षित आहे. ऋअसे आवाहन पवार यांनी केले. रविवार (ता. २२) रोजी मतदान आहे.

# आळंदीत इंद्रायणीचा रौद्र अवतार; नदीला पूर, घाट पाण्याखाली

**आळंदी । प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी प्रस्थान सोहळ्याच्या पूर्वसंध्येला आळंदी आणि परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने इंद्रायणी नदीने रौद्र रूप धारण केले आहे. नदीला मोठा पूर आला असून, ती दुथडी भरून वाहत आहे. या पूरस्थितीमुळे घाटावरील सर्व मंदिरे, पोलिसांचे स्वागत कक्ष आणि महिलांसाठी असलेले चेंजिंग रूम पाण्याखाली गेले आहेत. प्रसिद्ध भक्ती-सोपान पूलही पाण्याखाली गेल्याने परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

इंद्रायणीच्या पाण्याची पातळी धोकादायक पातळीवर पोहोचली असून, पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान आणि अक्राळविक्राळ बनला आहे. पुराच्या पाण्यासोबत मोठ्या



प्रमाणात जलपर्णीही वाहत येत आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करत नदीघाट पूर्णपणे बंद केला असून, भाविकांना घाटावर प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने इंद्रायणी नदीच्या घाटावर मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जीवरक्षक पथके सज्ज ठेवण्यात आली असून, नदीपात्रात दोन बोटीही तैनात करण्यात आल्या आहेत. आळंदीत पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी पाणी साचल्याने भाविकांची गैरसोय होत आहे. मिळेल त्या ठिकाणी आडोसा घेत वारकरी पावसापासून स्वतःचा बचाव करताना दिसत आहेत. मात्र, या नैसर्गिक आपत्तीनंतरही आळंदीत दाखल होणाऱ्या दिंड्या आणि वारकऱ्यांच्या उत्साहात तीळमात्रही घट झालेली नाही. पावसाच्या जोरदार धारा झेलत, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात वारकरी मोठ्या भक्तिभावाने आळंदीत प्रवेश करत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरील माऊलींच्या भेटीची ओढ आणि वारीतील सहभागाचा आनंद स्पष्टपणे दिसून येत आहे.

या ऐतिहासिक सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो भाविक आळंदीत दाखल झाले आहेत. पहाटेपासूनच आळंदी आणि पंचक्रोशीत पावसाने दमदार हजेरी लावल्याने काहीशा अडचणी निर्माण झाल्या असल्या, तरी वारकऱ्यांचा उत्साह आणि श्रद्धा या सर्वांवर मात करताना दिसत आहे.

# माऊलींच्या पालखी मार्गावर पाणीच पाणी; वारकऱ्यांना करावा लागतोय अडचणींचा सामना

**विश्रांतवाडी । प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे (दि. २०) पुणे शहरात आगमन होत आहे. मात्र, पालखी मार्गावरील कळस कुसमाडेवस्ती येथे पावसाचे पाणी साचून रस्त्याने तळ्याचे स्वरूप घेतले आहे. पुणे महापालिकेने पालखी स्वागताची जय्यत तयारी केल्याचा दावा केला असला, तरी पाणी साचण्याच्या ठिकाणी पुरेशा उपाययोजना न केल्याने वारकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

कळस येथील मुख्य रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले असून, सुमारे १५० ते २०० मीटर रस्ता पूर्णपणे जलमय झाला आहे. महापालिकेच्या मलनिस्सारण विभागाने पावसाळापूर्व कामे आणि नाल्यांची साफसफाई व्यवस्थित न केल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. पाण्याचा निचरा करण्यासाठी उभारलेली यंत्रणाही अपुरी ठरत आहे. यामुळे वारकऱ्यांना पाण्यातून वाट काढत प्रवास करावा लागत



असल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मलनिस्सारण विभागाचे कनिष्ठ अभियंता अक्षय वाडेकर म्हणाले, कळस येथील पावसाळी वाहिन्यांची रुंदी कमी आहे, आणि चेंबर खचला आहे. चेंबरखाली उच्च दाबाच्या विद्युतवाहिन्या असल्याने दुरुस्तीला अडचणी येत आहेत. सध्या पाण्याचा निचरा करण्यासाठी यंत्रणा कार्यरत आहे.

पुणे महापालिका दरवर्षी नाले आणि पावसाळी वाहिन्यांच्या साफसफाईसाठी कोट्यवधींची निविदा काढते, परंतु साफसफाई केवळ कागदावरच होते. यामुळे रस्त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त होत आहे. पालखी मार्गावरील पाणी साचण्याच्या समस्येमुळे वारकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे सरचिटणीस डॉ. धनंजय जाधव यांनी नवीन पालिका आयुक्तांनी मलनिस्सारण आणि देखभाल दुरुस्ती विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी आणि कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# पुणे पोलिसांमुळे मुळा-मुठा नदीत वाहून जाणाऱ्या एकाला मिळाले जीवनदान

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यामध्ये मान्सून पावसाचे जोरदार पुनरागमन झाले आहे. यापूर्वी राज्यात तुफान अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. यामुळे शेतकऱ्यांसह सामान्य जनतेचे मोठे नुकसान देखील झाले होते. यानंतर पावसाने काही काळ विश्रांती घेतल्यानंतर आता पुन्हा एकदा तुफान बँटिंग करण्यास सुरुवात केली आहे. तुफान पावसामुळे दुर्घटना देखील घडत आहेत. पुण्यात एक व्यक्ती मोटारसायकलसह बंधाऱ्यात वाहून जाताना पोलिसांनी त्याला वाचवले आहे. नवाज खुर्शीद कोतवाल (वय ३८ वर्ष रा. तुकाराम नगर, चंदन नगर पुणे) असे प्राण वाचवण्यात आलेल्याचे नाव आहे.

मुळा मुठा नदीवरील पाण्याचा विसर्ग वाढणार असल्याची माहिती खराडी पोलीस ठाण्यास मिळाली असता, पोलीस मुळा मुठा नदीवरील बंधाऱ्यावरील पुलावरील रस्ता बंद करण्यासाठी गेले, तेथे एक जण मोटरसायकलसह बंधाऱ्यावर मध्यभागी अडकल्याचे दिसून आले. त्यावेळी त्याला वाचवण्यासाठी फायर ब्रिगेडला तात्काळ कळविले, परंतु पाण्याचा प्रवाह वाढत होता तो पाण्यात वाहून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सहाय्यक पोलीस निरिक्षक खांडेकर, पोलीस अंमलदार



दोरगे, पोलिस हवालदार सय्यद, पोलिस अंमलदार गायकवाड, महिला पोलीस अंमलदार थोरात, महिला पोलीस अंमलदार मालवंडे, पोलीस अंमलदार साळके , पोलिस अंमलदार काळे यांनी स्वतःच्या जीवाची परवा न करता दोरीच्या साह्याने मानवी साखळी बनवून अडकलेल्या व्यक्तीला सुरक्षितरित्या बाहेर काढून त्याचे प्राण वाचविले. तसेच सदरचा रस्ता बॅरिकेट लावून पूर्णपणे बंद करण्यात आला आहे.

# शिंपोरे पुलाची तातडीने होणार पुनर्उभारणी; आठ दिवसांत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश

**खेड । प्रतिनिधी**

खेड ते मानेवाडीमार्गे शिंपोरा गावाला जोडणारा नांदणी नदीवरील पूल अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे २५ मे रोजी पूर्णपणे वाहून गेला. या पार्श्वभूमीवर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील विधान भवनात विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत पूल पुन्हा नव्याने आणि दर्जेदार पद्धतीने उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. आठ दिवसांच्या आत नव्या पुलासाठीचा प्रस्ताव तयार करून सादर करण्याचे स्पष्ट निर्देश सभापती प्रा. शिंदे यांनी दिले. तसेच पुलाचे आधीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होते का? याची चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याचेही आदेश देण्यात आले. (ङ्गीशींिं झींपश छ्शुी) ग्रामविकास मंत्री गोरे यांनी , नवा पूल या भागातील जनतेसाठी



अत्यंत आवश्यक आहे. जनतेच्या भावना प्रा. शिंदे यांच्याशी जोडल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे नव्या पुलासाठी निधी ग्रामविकास विभागाकडून तातडीने उपलब्ध करून दिला जाईल, असे सांगितले.

बैठकीस ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, एमएमजीएसवायचे सचिव सतीश चिखलीकर, सहसचिव के. जी. वळवी, उपसचिव प्रशांत पाटील यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उजनी पुनर्वसन विभागाचे अधीक्षक अभियंता साले आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे अधिकारी भदाणे उपस्थित होते. सभापती प्रा. शिंदे यांनी ९ जून रोजी स्वतः घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली होती. या बैठकीत त्यांनी प्रशासनाची तीव्र शब्दांत कानउघाडणी केली. लवकरच पूल बांधणीस सुरुवात होणार असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.